MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सतरावे / अंक ४ / एप्रिल २०१६

## संपादकीय

### लोकशाहीतील ठोकशाही

भोपाळ येथील नॅशनल ज्युडिशिअल ॲकॅडमी (National Judicial Academy India) येथे नुकत्याच केलेल्या एका भाषणात (सकाळ, रविवार १७ एप्रिल २०१६, पृष्ठ २) राष्ट्रपती प्रणब मुखर्जी यांनी न्यायालयाच्या सक्रियतेवर (Judicial activism) सडकून टीका केली आहे. न्यायालयांच्या सक्रीयतेमुळे विकेंद्रीकरणामध्ये अडथळा निर्माण होतो असेही त्यांनी सांगितले.

अर्थातच त्यांचा रोख न्यायालयांच्या कुठल्या निकालांवर होता याचा थांगपत्ता त्यांनी आपल्या भाषणात लागू दिला नाही. राज्यघटना हीच सर्वोच्च असल्याचेही सांगायला ते आपल्या भाषणात विसरले नाहीत.

भारताची राज्यघटना ही जगातली सर्वात मोठी राज्यघटना आहे. जगातल्या अनेक देशांच्या घटनांची उसनवारी करत ही राज्यघटना बनली आहे. मुळात ही इंग्रजीमध्ये लिहिली आहे. आपली सगळीच न्यायव्यवथा आणि तिचा व्यवहार हा इंग्रजीमध्येच चालतो. आपली घटनासुद्धा प्रामुख्यानी इंग्लंडमधील लोकशाही पाळत असलेले 'संकेत' आणि 'रुढी', आणि अमेरिकन लिखित राज्यघटनेवर आधारित आहे. साहजिकच भारताची सांस्कृतिक मानसिकता, आणि आपली राज्यघटना यामध्ये प्रचंड दरी आहे. घटना वाचून कुणीही नागरिक न्यायसंस्थेकडे आपली बाजू म्हणूनच मांडू शकत नाही. वकील हा मधला दलाल आणि त्याची योग्यती किंमत दिल्याशिवाय सामान्य मनुष्य न्यायसंस्थेच्या कुठल्याच पायरीवर उभा राहू शकत नाही. ही आपल्या न्याय व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे.

भारताच्या ९०% लोकांनी ही घटना वाचलेली तर सोडाच, पण त्यामध्ये व्यक्त केलेल्या तत्त्वज्ञानाचा आधारही समजून घेतलेला दिसत नाही. 'स्वातंत्र्य' हा एक परवलीचा शब्द असून तो भारतीय घटनेनी आपल्याला मिळालाय, असा एक गैरसमज सर्वचजण करून घेतात, आणि देतात. प्रत्येक मनुष्य त्याचं स्वातंत्र्य घेऊनच जन्माला आलेला असतो, पण 'स्वातंत्र्य' म्हणजे 'स्वैराचार' नसतो. स्वातंत्र्यापेक्षा, 'स्वैराचार' म्हणजे काय याचे शिक्षण संस्कृतीमधून मिळत असते. म्हणूनच भारताच्या सर्व धर्मसंकल्पनांमध्ये 'सहिष्णू'तेचा अंतर्भाव केला आहे, आणि हे सर्व 'धर्म' आणि 'पंथ' हे आपली घटनाच काय पण इंग्लंड आणि अमेरिकेच्या घटनांपेक्षाही प्राचीन आहेत. 'स्वातंत्र्य' संकल्पनेवरती लिहिताना संथानम् हे विधिज्ञ सांगतात -

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**

For civilised man, there can be no absolute liberty and therefore the precise determination of minimum unavoidable limitations, the manner in which such limitations have to be determined and the safeguards for ensuring that such limitations are not exceeded are of fundamental importance. This is true particularly in a democracy, as in a dictatorship, there can be no real curb on the arbitary will of the dictator except violent revolt. It is wrong to think that even in a democracy, liberty is automaticaly ensured because the legislatures are elected by the people party majorities in a democracy can be as subversive of liberty as dictatorships.


संस्थानम् म्हणतात त्याप्रमाणेच 'स्वातंत्र्य' किंवा 'आझादी'ला हुकुमशहांप्रमाणेच लोकशाहीकडूनही तेवढाच धोका असतो. लोकशाहीच्या माध्यमातूनच इंदिरा गांधीनी आणलेली 'आणीबाणी' हे याचे बोलके उदाहरण आहे. घटनेमध्ये 'घराणेशाही' किंवा 'व्यक्ती स्तोमाला' स्थान नाही. दुर्दैवाने आज आपल्या सगळ्याच 'राष्ट्रीय' आणि 'प्रांतीय' पक्षांमधील घराणेशाही आणि व्यक्तिस्तोमानी निचांक गाठल्याचे आपण अनुभवत आहोत. लोकशाहीचा आधार म्हणजे राजकीय पक्ष. तामिळनाडूमध्ये लवकरच विधानसभेच्या निवडणूका अपेक्षित आहेत. डी. एम. के. (D.M.K.) नी प्रसृत केलेल्या निवडणूक जाहीरनामा म्हणजे फुकटेपणाची खैरात आहे. शाश्वत आर्थिक, किंवा सामाजिक धोरणं तर दूर राहली, पण सवंग लोकप्रियता, आरक्षणं, स्मारकं आणि पुतळे यावर करदात्यांचे कोट्यावधी रुपये खर्च करीत, सध्या सर्वच पक्षांची लोकशाहीची सेवा चालू आहे.

प्रणब मुखर्जी यांचा रोख न्यायालयांच्या कुठल्या सक्रियतेकडे आहे हे आपल्याला उलगडत नसले, तरी न्यायालयाच्या सक्रियतेमुळेच सामान्य माणसाचे 'स्वातंत्र्य' थोडेतरी शाबूत आहे हेही तेवढेच वास्तव आहे. ललीत मोदी, मल्लया किंवा सहारा उद्योग समुहाचे सुब्रेतो यासर्वांनी आपल्याला घटना आणि लोकशाहीचा खरा अर्थ समजावून दिलाच आहे! आपली लोकसभा किंवा विधानसभेतील ५०% सभासदांवर कुठले ना कुठले तरी गुन्हे दाखल आहेत. ही शोकांतिकाच नाही, तर आपल्या सगळ्यांसाठी ही एक शरमेची बाब आहे. हे सर्व सभासद लोकशाही मार्गानी म्हणजे तुम्ही आम्ही निवडून दिलेले आहेत. दररोज वर्तमानपत्र उघडल्यावर गाड्या पळवण्यापासून खून, मारामाऱ्यांपर्यंत लोक प्रतिनिधिंची बातमी येणे हे आता नेहमीचेच झाले आहे. सुदैवाने अजून न्यायाधीशांच्या नेमणुका या लोकशाही पद्धतीने होत नाहीत हे आपले नशीबच आहे.

न्यायालयाचे सगळे निर्णय मान्य होणारे जरी नसले, तरी न्यायालयांच्या सक्रीयतेमुळेच आज तुमचे आमचे 'स्वातंत्र्य' आणि लोकशाही सदृश व्यवस्था आपल्यादेशांत काही प्रमाणात तरी अस्तित्वात आहे. न्यायालये सक्रिय आहेत म्हणून लोकप्रतिनिधींच्या धटिंगणशाही पासून नागरिकांच्या मूलभूत स्वातंत्र्याचे, अल्पस्वल्प तरी रक्षण होत आहे. आपल्या सणांचे तर राजकियीकरण झालेच आहे, पण आता लग्नासारख्या पवित्र संस्कारामध्येही राजकीय पक्षांची लुडबूड चालू झाली आहे. प्रत्यक्ष व्यवहारामध्ये लोकशाही, स्वातंत्र्य, घटना या सगळ्या संकल्पनांना आज लोकप्रतिनिधींनी बासनात बांधून ठेवले आहे. ज्येष्ठ विधिज्ञ विश्वनाथ अय्यर यांनी २ फेब्रुवारी १९७४ च्या स्वराज्यमध्ये तत्कालीन परिस्थितीचे केलेले वर्णन आणि आजची परिस्थिती यामध्ये फारसा फरक पडलेला नाही. ते म्हणतात,

It is sad, however, to contemplate the present situation in our country. Violence,

(पृष्ठ क्र. ३ वर)



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा

## वर्ष सतरावे/अंक ४/एप्रिल २०१६

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक १० वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | शास्त्रवेध-३-वनसंपदा | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | नर्मदा परिक्रमा (भाग : २६) | श्री. अरविंद ओक | ११ |
| ४) | ओळख वनस्पतींची-मेडशिंगी | श्री. प्रकाश दुधाळकर | १२ |
| ५) | डिजिटल मार्केटिंग | डॉ. सौ. अनघा गोखले | १३ |
| ६) | काशी के कंकर शिव-शंकर - काशी महात्म्य | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १६ |
| ७) | दान : एक सामाजिक बांधिलकी- जीवन व मृत्यूचे बंधन नसलेली | स्मिता लिमये | २३ |
| ८) | मातृभाषा हीच ज्ञानभाषा! | श्री. अरविन्द दोडे | २५ |
| ९) | शिक्षक आणि विद्यार्थी बदलत चाललेलं नातं | सौ. रागिणी केलसकर | ३० |
| १०) | माँटेसरी शिक्षणाचे शिक्षण प्रक्रियेतील अनन्य साधारण महत्त्व | सौ. मृणाल जामबोटकर | ३२ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# शास्त्रवेध-३
# वनसंपदा

*वनसंपदेविषयी माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

लहानपणी 'मिडास' राजाची गोष्ट ऐकलेली होती. त्याला त्याच्या डायोनिअस सिलेनस नावाच्या गुरूंकडून असे वरदान मिळाले होते की, तो हात लावेल त्या वस्तूचे सोने होईल. त्याने पाण्यास हात लावला तर पाण्याचे सोने झाले. अन्नास हात लावला तर त्याचेही सोने झाले. मग असा साक्षात्कार झाला की सोने पिता येत नाही, सोने खाता येत नाही. त्याच्या लाडक्या कन्येस त्याने हात लावला तर तीही सुवर्णमय झाली[१]. राजा आपल्या लाडक्या कन्येस निर्जीव होतांना पाहून शोकाकूल झाला. राजकन्या निर्जीव झाली. अन्न-पाण्यावाचून जीवन गमावण्याची पाळी आली. म्हणून त्याने, वरदान परत घेण्याची विनंती केली. डायोनिअस ह्यांनी ते परत घेतले आणि त्यास असे सांगितले की, त्याने त्याचे हात पॅक्टोलिअस नदीत धुऊन टाकावेत, म्हणजे वरदानाची किमया निरस्त होईल. त्याशिवाय, ज्या ज्या वस्तूंचे त्याने हात लावल्यामुळे सोने झालेले आहे, त्या वस्तूही पॅक्टोलिअस नदीच्या पाण्याने धुऊन घेतल्यास पूर्ववत होतील. मग तसेच करण्यात आले. राजकन्याही पुन्हा सजीव झाली. ह्या कथेचे सार हेच आहे की, सोने काही खाता येत नाही.




मुळात माणसाचा नैसर्गिक आहार काय आहे, काय असावा, ह्याची अनेक उत्तरे संभवतात. दगड, काच, पत्रा यासारखे असेंद्रीय, टिकाऊ पदार्थ कुणीच अन्नपदार्थ म्हणून वापरत नाही. तरिही अनेकविध क्षार, खनिजे आणि धातुंची संयुगे मानवी जीवनास आवश्यक ठरतात. हे सारेच असेंद्रिय पदार्थांत मोडतात. सेंद्रीय, नाशिवंत अन्नपदार्थ; नाश होण्यापूर्वीच सेवन करणे हा माणसाचा खरा आहार होय. सेंद्रीय अन्नपदार्थांत सजीव आणि निर्जीव दोन्हीही पदार्थ असतात. सजीवांमध्ये वनस्पती आणि प्राणी दोन्ही येतात. मात्र माणसाची शरीररचना वनस्पतिजन्य आहाराकरता घडलेली असल्याने, माणसाने प्राणिजन्य आहार घेणे अनैसर्गिक व म्हणूनच अपथ्यकर ठरते. तेव्हा माणसाने वनस्पतिजन्य आहार, शक्यतोवर वनस्पतीच्या मुळावेगळा करण्याच्या वेळेपासून लवकरात लवकर, मुळीच प्रक्रिया न करता, अथवा कमीत कमी प्रक्रिया करून सेवन करावा. निर्जीव पदार्थांत पाण्याचा समावेश होतो. मानवी शरीरातील बहुतांश हिस्सा पाण्याने व्यापलेला असल्याने, त्याच्या भरण-पोषण आणि चयापचयाकरता पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आरोग्यपूर्ण, स्वस्थ जीवनाकरता, दिवसाला किमान दीड लिटर पाणी प्रत्येकाने सेवन करावे असे सांगितले जाते. विशेषतः थंडीच्या दिवसांत पाण्याचे सेवन खूप घटत असते. तेव्हा ही काळजी घेणे जास्त महत्त्वाचे ठरते.

मात्र काहीही झाले तरी अन्नपाण्याविना माणूस जगूच शकत नाही. अन्नही वनस्पतीजन्यच असायला हवे. ह्याचाच अर्थ असा की, वनस्पतींविना मनुष्यजीवन अशक्यप्राय आहे. मनुष्य प्राणवायूविना जगू शकत नाही,

आणि प्राणवायूही वनस्पतीच पुनरुज्जिवित करत असतात, त्यामुळेही वनस्पतींविना मनुष्यजीवन अशक्यप्राय आहे. वनस्पतींचा महिमा अगाध आहे. खालील कवितेत त्याचेच यथार्थ वर्णन केलेले दिसून येईल.



**वनस्पती**

वनस्पती तुझे रूप देखणे, मजेत डोलणे, फुलून राहणे ।
रंग वेगळे, नेत्ररंजना, गंध आगळे, मोहिती मना ॥ १ ॥
सावली तुझी, शुद्ध गारवा, 'अपान' घेउनी, 'प्राण' दे नवा ।
वापरून तू, सौरशक्तीला, 'अन्न' घडविशी मनुजपोषणा ॥२॥

(चाल बदलून)


भूस्थिर राहून, मृद संधारिशी, दूर प्रदूषण, तू पिटाळसी ।
जगशी, मरशी, इथे राहसी, सोडुनी ना कधी अम्हास जाशी ॥३॥
आम्ही तुजसी कृतज्ञ राहू, वंशसंपदा तुझी वाढवू ।
तुला सोडुनी जगणे आम्हा, पळ तरी शक्य असे का? ॥४॥
तरूवर आणि मानव भाऊ, अवनीवरती सर्वही राहू ।
खेचर, जलचर, साऱ्यांशी या परिसरी, जुळवून घेऊ या ॥५॥

अशी सर्व परिस्थिती असल्याने, संत तुकाराम म्हणतात तसे वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे, ही अवस्था अनादी कालापासून निरंतर कायम आहे. एवढेच काय, पण पृथ्वीवरच्या ज्या भागांवर मानवी पदचिन्हे आजवर कधीच उमटली नाहीत अशा अंदमानी बेटांवरही घनदाट पडौकवने विकसित झालेली आहेत. वरील चित्रात असेच एक पडौक-वृक्ष-वन दाखवलेले आहे. विकिपेडियावर भारतीय वनांचे १६ प्रकार वर्णिलेले आहेत.

| अ.क्र. | मराठी नाव | भारतीय भूभाग | प्रमुख वनस्पती |
|---|---|---|---|
| १ | उष्णकटिबंधीय आर्द्र सदाहरित वने | पश्चिम घाट, आसाम, अंदमान आणि निकोबार | नागचाफा (Mesua), देवदार, तून, अगर (ऊद), बांबू |
| २ | उष्णकटिबंधीय निम-सदाहरित वने | पश्चिम किनारी प्रदेश, आसाम, ओडिशा, अंदमान आणि निकोबार | सेमल, रोजवूड, नागचाफा, कदंब (Haldu), काटेरी बांबू |
| ३ | उष्णकटिबंधीय दमट पानगळीची वने | संपूर्ण अंदमान-निकोबार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, केरळ | साग, मोह, आवळा, कुसुम, बांबू |
| ४ | समुद्रकिनाऱ्याची आणि दलदली वने | संपूर्ण समुद्री प्रदेश आणि मोठ्या नद्यांच्या जवळचा भाग | सुंदरी, अगर, रानभेंडी, केवडा |
| ५ | उष्णकटिबंधीय शुष्क पानगळीची वने | राजस्थान, पश्चिम घाट आणि बंगालचा भाग सोडून उर्वरीत भारत | साग, तेंदू, बिजा, अमलतास, अंजन, बेल, खैर, बांबू |
| ६ | उष्णकटिबंधीय काटेरी वने | पंजाब, राजस्थान, गंगेचे खोरे, दक्षिणी पठार | चंदन, कडुनिंब, खैर, पळस |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | उष्णकटिबंधीय शुष्क सदाहरित वने | उन्हाळी पाऊस पडणारा कोरोमंडलचा भाग | कडुनिंब, रिठा, चिंच |
| ८ | अर्ध-उष्णकटिबंधीय रुंद पानांची डोंगरी वने | हिमालयाच्या उताराचा भाग, महाबळेश्वर, निलगिरी पर्वतरांगा | जांभूळ |
| ९ | अर्ध-उष्णकटिबंधीय सूचिपर्ण वने | काश्मीर सोडून वायव्य-हिमालयाचा १००० ते १८०० मी. उंच भाग, मणिपूर, खासी व नागा पहाड | ओक (Oak), लाली गुरांच (Rhododendron), चीर देवदार (Chir) |
| १० | अर्ध-उष्णकटिबंधीय शुष्क सदाहरित वने | पश्चिम हिमालयाच्या १००० मी. उंचीपर्यंतचा भाग | लवंग, पिस्ता |
| ११ | डोंगराळ आर्द्र समशीतोष्ण वने | केरळ, डोंगराळ तामिळनाडू, आसाम, अरुणाचल प्रदेशचा उंच भाग १८०० ते ३००० मी. | अलबुखार (Plum), भूर्जपत्र (Birch), चाफा (Magnolia), वेलदोडे |
| १२ | हिमालयी दमट समशीतोष्ण वने | हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश, सिक्कीम, दार्जिलिंगचा १५०० ते ३३०० मी. उंच भाग | देवदार, ओक, मॅपल, स्प्रूस, सूचिपर्ण (Fir), भूर्जपत्र |
| १३ | हिमालयी शुष्क समशीतोष्ण वने | लडाख, गढवाल, सिक्कीम | देवदार, ओक, मॅपल, चिलगोझा देवदार |
| १४ | अर्ध हिमालयी वने | हिमालयाच्या पर्वतरांगा | सूचिपर्ण, देवदार, लाली गुरांच, अलबुखार, यिऊ |
| १५ | दमट हिमालयी झुडपे | हिमालयाच्या ३००० मी. उंची पर्यंतचा भाग | भूर्जपत्र, लाली गुरांच, बर्बेरिस, हनिसकल |
| १६ | शुष्क हिमालयी झुडपे | हिमालयाच्या ३५०० मी. उंची पर्यंतचा भाग | ज्युनिपर, हनिसकल, अर्टेमेसिआ |

खरे तर आधी वनस्पती निर्माण झाल्या. त्यांच्या आधारेच मग शाकाहारी सजीव निर्माण झाले. त्या सजीवांवरच पुष्ट होणारे मांसाहारी सजीव त्यानंतर निर्माण झाले. पृथ्वीवर मनुष्यच काय पण इतर सजीवही नव्हते तेव्हापासूनच आपली सृष्टी वनावृत्त आहे. हवा, पाणी आणि अन्न ह्या मूलभूत गरजा भागवण्यासोबतच जळाऊ आणि इमारती लाकूड आपली जन्मभर सोबत करत असते. चाँद को छुनेवाले इन्सां, देख तमाशा लकडी का ह्या कव्वालीत तर लाकडाच्या वस्तूंची ही अपार महतीच वर्णन केलेली आहे.




भारतीय वन सर्वेक्षण-२०१३ नुसार भारतातील एकूण भूमीच्या २१.२३% जमीन वनावृत्त आहे. शिवाय गेल्या

काही दशकांत त्यात निरंतर वृद्धीही होत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. मानववंश अवनी तलावर चिरकाल टिकायला हवा असेल तर वने चिरजीवी व्हायला हवीत. सामाजिक वनीकरणाचे आधारे, तसेच पडीक जमिनीवरील वृक्ष लागवडींद्वारे आपण हे साध्य करण्याचा भरकस प्रयासही करत आहोतच.

जंगलतोड, चराई, आग, जंगल तोडून शेतीत होणारे रूपांतर, औद्योगिकीरण, रस्ते इत्यादी अनेक कारणांमुळे जंगल क्षेत्र झपाट्याने कमी होत आहे. भारतातील जंगलांत सुमारे ४५ हजार वनस्पतींचे प्रकार सापडतात. ग्रामीण भागात आजही अनेक लोक आपला उदरनिर्वाह या वन उपजांच्या माध्यमातून करत असतात. अनेक वन उपजांची निर्यात विविध देशांमध्ये होत असते. मध, डिंक, लाख, औषधी इत्यादींची मोठी निर्यात आपल्या देशातून प्रगत राष्ट्रांमध्ये होते. भारतामधील जंगलांतून २०० वनस्पती सुगंधी द्रव्य देणाऱ्या आहेत, १०० वनस्पती नैसर्गिक रंग देणाऱ्या आणि १२० वनस्पती डिंक देणाऱ्या आहेत. त्याचबरोबरीने सुमारे ३,००० वनस्पती औषधी आहेत.

समुद्रकिनारे, खाड्या, कायले (ब्ल्यू-लगून्स), खाजणे ह्यांतील सदाहरित कांदळवने, तिवरे व खाऱ्या पाण्यातही सर्वकाळ उत्तमरित्या टिकाव धरणाऱ्या वनस्पतींनी समुद्रातील भरती-ओहोटीपायी होणाऱ्या भूमी-क्षरणापासून होणारा भूमीचा ऱ्हास, शतकानुशतके थांबवलेला आहे.

समुद्रकिनाऱ्यांवर नारळी-पोफळी, ताडी-माडी, शिंदी-सुरू (कॅसुरिना) इत्यादी झावळ्यांचे वृक्ष जगभर विखुरलेले आहेत. त्यांची फळे, झावळ्या आणि लाकूड ह्यांनी आपले जीवन समृद्ध केलेले आहे. जायफळ, लवंग, काळे मिरे, दालचिनी, तमालपत्रे इत्यादी मसाल्याच्या पदार्थांच्या वृक्षराईंनी किनारे समृद्ध आहेत. कोकणात तर आंबे, फणस, काजू, कोकमादी वृक्षांनी किनारी जीवनांत रुचीही आणलेली आहे. आपल्या जंबुद्विपातील जांभळांच्या वृक्षामुळेच उपखंडास हे नाव पडले आहे. इथल्या उंबर, वड आणि पिंपळ इत्यादी वृक्षांच्या गर्द छायेतच आपल्या गावांचे पार नांदत असतात. ह्यांना अश्वत्थ वृक्ष म्हटले जाते. श्रीकृष्णाने स्वतःच अश्वत्थः सर्व वृक्षाणां म्हणजे सर्व वृक्षांत जसे अश्वत्थ; तसा तो स्वतः असल्याची ग्वाही गीतेत दिलेली आहे. चिंचा, विलायती चिंचा, आवळे, बोरे, कवठे, बेल, बाभुळ, सुबाभुळ इत्यादी काटेरी झाडे शेळ्या-मेंढ्या, उंट ह्यांसारख्या पाळीव प्राण्यांची भूक भागवतात.

मध्य भारतातील निबीड अरण्यांतील बकुळ, बहावा, बूच, मोह, तेंदू, साग, धावडा, चारोळी, बांबू इत्यादी वनराजीने आपल्या पिढ्यानपिढ्यांचे भरपूर पोषण केले आहे. मोहाची फुले, आजही मध्यप्रदेशातील आदिवासींचे परंपरागत आवडते खाद्य आहेत. पळस, पांगारा, शाल्मली (सावली, काटेसावर), खैर (खदिर), अंजनादी विशाल वृक्षही आपापल्या वल्लरींसह वनांना सदैव घनदाट करत असतात. आंबे, फणस, पेरू, संत्री, नारिंगे, डाळिंबे, पपई ह्यासारख्या फळझाडांची लागवड तर मनुष्यजमात सर्वत्र, अत्यंत आवडीने आणि प्राधान्याने करत असते.

अगर वृक्षापासून अगरबत्ती होते. अगर वृक्षांचे माहेरघर ह्या अर्थानेच त्रिपुराची राजधानी आगरताला ही ओळखली जाते. निलगिरी पर्वतावरील चंदनाची झाडे सुगंधी वनस्पतींचे आणखी एक उदाहरण आहे. टर्पेन आणि निलगिरी तेले तर औषधी गुणांखातर लोकप्रिय आहेत. गिरिपुष्प (ग्लिरिसीडिया) या वनस्पतीची फुले, जी फक्त जानेवारी ते मार्च या काळातच येतात, ती गव्हाच्या शेतात किंवा घरात आठवड्यातून एकदा या प्रमाणे दोन-तीन वेळा वापरली, तरी मोठमोठ्या घुशी देखील मरतात. या वनस्पतीला उंदीरमार (Rat Killer) वनस्पती म्हणून ओळखले जाते.

---

पैशाचे नाव 'अर्थ', पण तो करतो मोठा अनर्थ! - गोंदवलेकर महाराज

मध्यम उंच पर्वतांवरील वनांत शाल्व (साल) वृक्षांची दाटी दिसून येते. ह्या वृक्षाच्या लाकडांचा उपयोग लोहमार्गाला आधार पुरवणाऱ्या ओंडक्यांकरता (स्लिपर्स करता) केला जातो. त्याहून उंच पर्वतांवरील वनांत देवदार, चिनार, भूर्जपत्र इत्यादी वृक्षांचा आढळ होत असतो. देवदार वृक्षांच्या ओंडक्यांचे व दगडांचे थर एकमेकांवर रचून हिमालयाच्या पायथ्याची घरे निर्माण केली जातात. त्या शैलीला काठ-खुनी स्थापत्य शैली म्हणतात.



ह्या शैलीतील बांधकाम आणि वर घातलेले फरशांचे छत वरील चित्रात दिसून येत आहे.

कित्येक पानगळीची जंगले उन्हाळ्यात निष्पर्ण होऊन जळून गेल्यासारखी वाटतात. पण वसंतात, आणि ग्रीष्मात, तसेच पहिल्या पावसासोबत, त्यांना फुटणारी पल्लवी साऱ्या वनासच हिरव्या रंगच्छटांनी सुशोभित करून टाकते. शाल्मली, सिताफळ ही अशा वनस्पतींची लक्षात राहण्यासारखी उदाहरणे आहेत. याउलट सुबाभुळ, पर्जन्यवृक्ष, जांभूळ, वड, पिंपळ, उंबर, कडूनिंब इत्यादी सदाहरित वृक्ष कायमच सावलीची सोय करत असतात. त्यांची जीर्ण पाने गळत असतात, तशीच नवी पालवीही कायमच फुटत असते.

फळे व रानभाज्या विक्री करून काही आदिवासी आपली गुजराण करतात. जंगली फळे ही अत्यंत औषधी असतात. जीवनसत्त्वे, प्रथिने, नैसर्गिक शर्करा इत्यादींनी ती भरपूर असतात. यांनी ती परिपूर्ण असतात. या फळांना बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी वाढते आहे. अळू, भेडस, जांभूळ, अटकी, अंजन, करवंद, चिंच, चारोळी, आवळा, देव्हारा, बोर, कोकम, पिवळा कोकम इत्यादींचा ह्यांत समावेश होत असतो. ही जंगलांत मिळतात. रानभाज्या व काही कंद जंगलांतच मिळतात. या भाज्या व कंदांमध्ये अनेक विकार बरे करणारे घटक असतात. टाकळा भाजी पोट साफ करण्यासाठी, भारंगी भाजी पोटातील वायू काढण्यासाठी वापरली जाते. शेवळ, पेव, शेवगा, कढीपत्ता, पांढरा कुडा, सफेद मुसळी, करांदा, कार्टोली इत्यादीही त्यांत समाविष्ट असतात. ती भाजीसाठी आपल्याकडे वापरली जातात. ही वन उपजे निसर्गातील असल्याने, यांत कुठलेही कृत्रिम रसायन नसल्याने, ती आरोग्यासाठी फलदायी असतात.

भारतात जंगलांवर आधारलेल्या रोजगारांपैकी ५५% रोजगार हा वन उपजांच्या माध्यमातून मिळतो. महाराष्ट्रातही खालील वनस्पतींच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होते. या झाडांची लागवड, अस्तित्वात असलेल्या झाडांची जपणूक, संवर्धन करणे आवश्यक आहे.

१. डिंकः बाभूळ, खैर, सोनखैर, कांडोळ, पांढरूक, मोई, धावडा, पळस, कवठ, गोगल, वेडीबाभूळ, बिवळा, शिरीष, काजू, कांचन, महोगणी, कडुनिंब, आंबा, इलायती चिंच, हिरडा, बेहडा, ऐन, किंजळ इत्यादी.

२. सुगंधी डिंकः धूप, साल, गुग्गुळ इत्यादी.

३. रंगनिर्मितीः कांदळ व खारफुटी प्रजाती, बाभूळ, मोठी तरवड, बाहवा, अर्जुन, जंगली बदाम, बोर, चारोळी, सुरू, अंबाडा, धावडा, ऐन, देवी-देवी, पळस, मेंदी, रक्तचंदन, कांचन, कुंभा, आवळा, आंबा, नागकेशर, बकुळ, नोनी, काजू, बिब्बा, अंजन, पारिजातक, धायटी, रामफळ, शेंद्री, कुंकूफळ, शेवगा इत्यादी.

४. रबरः हेविया ब्राझेलेसिंस

५. लाख निर्मितीः पळस, कुसुम, बोर, खैर, शिरीष, उंबर, पिंपळ, वड, घोटीबोर इत्यादी.

६. चारा पिकेः आसाणा, उंबर, जांभूळ, वड, पिंपळ, बोर, रेन ट्री, आपटा, कांचन, बाभूळ, शिरीष, फणस, कडुनिंब, तुती, पांगारा, निंबारा, बेहडा, ऐन, बांबू, तिवस, धावडा, शिसम, सुबाभूळ, शेवगा, बिवळा, अंजनी, करंज, आंबा, हादगा, पुसर इत्यादी.

७. सुगंधी द्रव्येः सिट्रोनेला, लसूण गवत, गवती चहा, पामारोझा, खस गवत, चंदन, केवडा, जायफळ, दालचिनी, निलगिरी, तिसळ इत्यादी.

८. औषधीः सर्पगंधा, वेखंड, कोरफड, सदाफुली, धोतरा, चिराईत, रानकांदा, आवळा, गुळवेल, शतावरी, पांढरी मुसळी, काळी मुसळी, मंडुकपर्णी, ब्राह्मी, हिरडा, बेहडा, काळमेघ, अश्वनगंधा, गुग्गुळ, सोनामुखी, वावडिंग, चित्रक, मंजिष्ठ, लोध्र, वरुण, टेटू, पाडळ, अग्निमंथ, शिवण, बेल, रिंगणी, काटेरिंगणी, सालवण, पिठवण, गोखरू, नागकेशर, कोलिंजन, कुटकी, कुडा, सीताअशोक, भारंगी, शंखपुष्पी, डुमार, नरक्यार, जांभूळ, काजरा, अक्कलकाढा, आघाडा, नोनी, बिवळा, रिठा, गोकर्ण, माका इत्यादी.

९. फळे व बियाः बेल, लवफळ, करवंद, भोकर, आवळा, कवठ, चारोळी, जांभूळ, तोरण, ताडगोळे, शिंदी, अटकी, बोर, काजू, कौशी, कोकम, बकुळ, मोह, चिंच, इलायती चिंच, जंगली बदाम, बाहवा, भेरलीमाड, तुती, बेहडा, हरडा इत्यादी.

१०. कागद निर्मितीः बांबू, निलगिरी, जांभा, ऐन, खैर, धावडा, तेंदू, सळई, बिवळा, सुबाभूळ, सुरू, ऑस्ट्रेलियन बाभूळ, बाभूळ, बेल, पळस, शिसम, मोह, तुती, कांडोळ इत्यादी.

११. अखाद्य तेल व जैव इंधनः करंज, उंडी, मोह, कुसुम, कडुनिंब, वनएरंड, नागकेशर, बदाम, खिरनी, कोकम, पिसा, शेवगा, धूप, चंदन, मालकांगणी, रिठा, चारोळी, बेल इत्यादी.

१२. तंतू व दोर निर्मितीः पांढरूक, अंजनी, पळस, पळसवेल, आपटा, धामण, सावर, पांढरी सावर, रुई, कुडा, पिंपल, वड, भेरलीमाड, घायपात, रेम्ही, कुंभा, तिवस, भेंड, केवडा, फणस इत्यादी.

१३. सुशोभिकरण व रस्त्याच्या कडेने लावण्यासाठीः कांचन, बकुळ, सुरंगी, कोकम, आंबा, जारू, सावर, वड, उंबर, पिंपळ, उंडी, कॅशिया, पळस, रेन ट्री, भेरलीमाड, बॉटलब्रश, सीताअशोक, कडुनिंब, पिचकारी, चाफा, पेल्टोफोरम, वायावर्ण, करमळ, बाहवा, अशोक, जकारंडा, पोईनशिया, रक्तरोहिडा, चिंच इत्यादी.

१४. रस्त्याच्या दुतर्फा आणि शहरी भागात लागवडीसाठीः गोरखचिंच, रतनगुंज, देवी-देवी, हळदू, बेल, महारूख, ऑस्ट्रेलियन बाभूळ, अंकोल, शिरीष, सातवीन, रामफळ, सीताफळ, कदंब, करमळ, कडुनिंब, कांचन, आपटा, शेंद्री, सळई, पळस, बॉटलब्रश, बाहवा, गुलाबी- पिवळा कॅशिया, सुरू, पांढरी सावर, नारळ, भोकर, कैलासपती, वायावर्ण, सायकस, शिसम, शिसू, गुलमोहर, आवळा, आंबा, कवठ, वड, पायर, उंबर, कृष्णवड, पिंपळ, कौशी, कोकम, शिवण, कुडा, कडू कवठ, जाकरंडा, जारूल, मोई, चिकू, खिरणी, निंबारा, कळम, शेवगा, तुती, कढीपत्ता, पारिजातक, कॉपरपॉड ट्री, चाफा, अशोक, करंज, पेरू, पुत्रंजिवा, बॉटल पाम, रेन ट्री, सीताअशोक, पिचकारी, कांडोळ, पाडळ, टेटू, अग्निमंथ, जांभूळ, टॅबोबिया, चिंच, रक्तरोहिडा, अर्जुन, साग, बेहडा, हिरडा, भेंड, निर्गुडी, निलमोहर, काळाकुडा, निलगिरी इत्यादी.

---

१५. बिडी उद्योगः आपटा, तेंदू, फणस, पळस, उंबर, केळी, कुंभा, कुडा इत्यादी.

१६. काडेपेटी उद्योगः आंबा, कदंब, कळम, महारूख, सातवीन, मोह, अशोक इत्यादी.

१७. नत्र स्थिर करणाऱ्या प्रजातीः ऑस्ट्रेलियन बाभूळ, खैर, बाभूळ, सोनखैर, पळस, बाहवा, तरवड, सुरू, शिसम, शिसू, गुलमोहर, गिरिपुष्प, शेवगा, इलायती चिंच, करंज, खेजरी, वेडीबाभूळ, पर्जन्यवृक्ष, सीताअशोक, चिंच, शेवरी, हादगा, पांगारा इत्यादी.

१८. जळाऊ लाकूड देणाऱ्या प्रजातीः ऑस्ट्रेलियन बाभूळ, बाभूळ, ऐन, किंजळ, चेर, बेहडा, हिरडा, सुबाभूळ, खैर, शिरीष, नीम, शिसम, आवळा, पांगारा, शिवण, करंज, वेडीबाभूळ, खेजरी, चिंच, बोर, जांभूळ इत्यादी.

१९. कोळसा तयार करण्यासाठी उपयुक्त प्रजातीः ऑस्ट्रेलियन बाभूळ, शिरीष, नीम, पळस, सुरू, शिसम, आवळा, निलगिरी, इलायती चिंच, खेजरी, वेडीबाभूळ, बोर इत्यादी.

२०. फर्निचरसाठीः बाभूळ, हळदू, शिरीष, नीम, शिसम, शिसू, शिवण, मोह, साग, अर्जुन, बेहडा इत्यादी.

२१. प्लायवूड तयार करण्यासाठी उपयुक्त प्रजातीः हळदू, महारूख, शिरीष, सातवीन, कदंब, सावर, सळई, शिसम, शिसू, शिवण, वावळ, मोह, जांभूळ, साग, बेहडा इत्यादी.

२२. सूत उद्योगासाठी उपयुक्त प्रजातीः शिसम, जारूल, मोह, तुती, अर्जुन, बोर इत्यादी.

२३. कोरीव कामासाठी उपयुक्त प्रजातीः शिरीष, वायावर्ण, शिसम, शिसू, शिवण, चंदन, साग, काळाकुडा इत्यादी.

२४. खेळणी तयार करण्यासाठी उपयुक्तः पांगारा, रानपांगारा, सावर, आंबा, जांभूळ इत्यादी.

२५. खाजण क्षेत्र, विम्लधर्मी व टाकाऊ जमिनीसाठी उपयुक्त प्रजातीः ऑस्ट्रेलियन बाभूळ, बाभूळ, शिरीष, नीम, पळस, बॉटलब्रश, मोठी तरवड, बाहवा, सुरू, आवळा, गिरिपुष्प, ताम्हन, मोह, तुती, शिंदी, करंज, वेडीबाभूळ, उंडी, अर्जुन, भेंड, बोर इत्यादी.

२६. लाल मुरमाड, दगडगोट्याच्या जमिनीसाठी वनवृक्षः ऑस्ट्रेलियन बाभूळ, सातवीन, काजू, धावडा, बांबू, सावर, शिसू, शिसम, अंजनी, वावळा, मोह, बिबळा, चंदन इत्यादी.

२७. धूप प्रतिबंधकः बाभूळ, महारूख, शिरीष, काजू, नीम, सुरू, शिसम, खेजरी, वेडीबाभूळ, रक्तरोहिडा, बोर इत्यादी.

२८. दलदलीच्या जमिनीसाठीः कांदळ, समुद्रफळ, उंडी, केवडा, भेंड, सुरू, करंज इत्यादी.

२९. शेताच्या कडेने बांधावर लावण्यासाठी उपयुक्त वृक्षः गिरिपुष्प, निंबारा, शेवगा, तुती, इलायती चिंच, जांभूळ, भेंड, ऐन, फणस, ऑस्ट्रेलियन बाभूळ, एरंडी, शेवरी इत्यादी.

३०. सावली आणि उपयुक्त पाने देणारी प्रजातीः शिरीष, कदंब, कडुनिंब, बाहवा, सुरू, भोकर, शिसम, आवळा, गिरिपुष्प, शिवण, सिल्व्हरओक, जारूल, बकुळ, अशोक, करंज, पुत्रंजिवा, पर्जन्यवृक्ष, सीताअशोक, चिंच, नागकेशर, अर्जुन, जंगली बदाम, भेंड, ऑस्ट्रेलियन साग, ऑस्ट्रेलियन बाभूळ, आंबा इत्यादी.

३१. सजीव कुंपणासाठी व गुरांना अडथळा निर्माण करण्यासाठी उपयुक्तः बॉटलब्रश, बाहवा, सुरू, पांगारा, गिरिपुष्प, जारूल, इलायती चिंच, खेजरी, वाकेरीचा भाता, चिलार, सागरगोटा, घायपात, वनएरंड, भेंड इत्यादी.

---

युद्धाची खरी भयानकता त्यात माणसे मरतात ही नसून, माणूस माणसाला मारायला तयार होतो ही आहे!

अशा रीतीने, जंगले ही मृदूसंधारण, हवामान, पाणी उपलब्धता, दुष्काळ आणि पूर नियंत्रणाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. याचबरोबरीने जंगलांतून मिळणारे लाकूड आणि वन उत्पादनापासून मोठी आर्थिक उलाढाल होते. या वन उपजांचा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये मोठा वाटा आहे. वनवृक्षांचे संवर्धन केल्यास पर्यावरणाला फायदा होईलच, त्याचबरोबरीने लघु उद्योगाला कच्च्या मालाचा पुरवठाही योग्य प्रमाणात होईल.

लाकडाचा उपयोग इमारत, फर्निचर, पेपर, जळण, इंधन, कोळसा, खेळणी इ. अनेक गोष्टींसाठी होतो. लाकडाबरोबर जंगलांमधून आपणास मध, अन्न, फळे, फुले, जनावरांचे खाद्य, तंतू, बांबू, वेत, औषधी वनस्पती, सुगंधी द्रव्य देणाऱ्या वनस्पती, नैसर्गिक रंग, पाने, डिंक, सुंदर काष्ठशिल्पं, कात, कच, खिरसाल, झाडांच्या साली, मुळे, बिया, लाख, रेशीम, मसाल्याचे पदार्थ, वनस्पतिजन्य कीडनाशके इत्यादी वन उपजे मिळतात.

राज्यातील जंगलांमधून जांभूळ, चिंच, फणस, कोकम, करवंद, अळू, आवळा, ताडगोळे, ताडीमाडी, चारोळी, आंबा, तोरण इत्यादी फळे; कढीपत्ता, टाकळा, भारंगी, चेर, पेव, करांदा, सफेद मुसळी, माठ, घोळ, कुडा इ. भाज्या; सुगंधी वनस्पतींमध्ये केवडा, चंदन, दालचिनी जंगलामधून जमा केल्या जातात. जनावरांच्या खाद्यासाठी शिवण, धामण, कांचन, आपटा, शेवरी, तुती, असाणा, किंजळ, ऐन, बांबू इ. प्रजातींची पाने वापरली जातात. जंगलांमधून मिळणाऱ्या गवतावर एकूण पशुधनापैकी ३०% पशुधन अवलंबून आहे. उन्हाळ्यामध्ये शेळ्या-मेंढ्या, जनावरांना या झाडांची पाने खाद्य म्हणून उपयोगी पडतात.

जंगल परिसरातील लोक जंगल परिसरातून मध गोळा करणे, साबण उद्योगासाठी रिंगी-रिठा या झाडांची फळे गोळा करणे, शिकेकाई, वावडिंग, बिब्बा, पळस फुले, गुळवेल, अर्जुनसाल; हिरडा, बेहडा, आवळा इत्यादी फळे (ह्यांपासूनच त्रिफळा चूर्ण तयार केले जाते) गोळा करतात. ऐन, खैर, बिवळा, कांडोळ, कडुनिंब, बाभूळ यांपासून डिंक गोळा केला जातो. या डिंकास मागणी परदेशांतून मोठ्या प्रमाणात वाढते आहे. जंगले हा नैसर्गिक रंग देणारा कारखाना आहे. झाडांची पाने, फुले, साल, बिया इ.पासून रंग काढला जातो. पळस फुलांपासून नारिंगी रंग, शेंद्रीपासून शेंदरी रंग, नीळपासून निळा रंग इ. रंग मिळतात.

वनसंपदा ही आपल्या जीवनाचा अविभाज्य, निरंतर आणि अत्यावश्यक भाग आहे. तिचे आपण सम्यक् ज्ञान करून घेणे आणि आपल्या प्रगती व समृद्धीकरता पुरेपूर उपयोग करून घेणे ह्यातच आपले हित सामावलेले आहे!

संदर्भः

जंगलांच्या संवर्धनातून वाढवा वनोपजांचे उत्पादन, डॉ. दिगंबर मोकाट, डॉ. संजय भावे,
http://www.agrowon.com/Agrowon/20121230/5639805524098782099.htm,
Sunday, December 30, 2012 AT 01:15 AM (IST).

[1] Nathaniel Hawthorne, 'A Wonder-Book for Girls and Boys (1852)' https://en.wikipedia.org/wiki/A_Wonder-Book_for_Girls_and_Boys

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : २६**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**शनिवार दि. २ फेब्रुवारी २०१३. दिवस ६९ वा. बिसेर बगलवाडा (चितळे दांपत्य यांचे घर)**

सकाळी ६ वाजता शेत ओलांडून बहिर्दिशेसाठी बाहेर जावे लागले आणि चपलांना चिखलाचा इतका जाड थर लागला की अर्धा तास मेहनत करूनही सोल स्वच्छ झाले नाहीत आणि चपला तशाच पिशवीत टाकाव्या लागल्या.

सगळे बाहेर पडले. मीही त्याचमार्गावर निघणार तोच देवीसिंग आले, चहाचा आग्रह करू लागले. अशोक दांपत्य निघून गेले. कारण नरेश कुमारांकडेही चहाचे निमंत्रण होते. मी मात्र थांबलो.

काल अचानक बन्सीची भेट झाली. बुधनी नंतर जो नाहीसा झालेला कुत्रा सध्या एका तरुण साधूबरोबर तो होता. हा साधू बिघडलेला होता. कारण त्याच्या मोबाईलवर अश्लील क्लिप्स होत्या असे मला नंतर बन्सीकडून समजले.

आज माझी आणि बन्सीची जोडी इतकी छान जमली की ऊँचा खेड्यावरून येताना ज्या वेगात आम्ही रस्ता कापला, त्याच जोशात आजही रस्ता कापला.

वाटेत नारद नदी लागली. गुढघाभर पाणी होते, चिखल नव्हता नंतर पुन्हा वरूण नावाची नदी लागली. परंतु त्यावर लोखंडी पूल होता. पलीकडच्या टेकडीवर चहा मिळाला. चहा करणारे होते श्रीयुत चितळे. ज्यांच्या सौ. च्या DVD निवेदनामुळे आमच्या परिक्रमेमध्ये प्रेरणेला बळ मिळाले.

वाटेत भरपूर बोरे खाल्ली. बोरीची झुडुपेसुद्धा बोरांनी लगडली आहेत आणि उंच मोठ्या परंतु संख्येने तुरळक बोरींना भरपूर बोरे लागलेली होती. लक्षात आले की फक्त उंच मोठ्या झाडांची बोरेच खाण्यालायक गोड होती, तर लहान बोरीची फळे सरसकट आंबट होती.

दुपारी दोनच्या सुमारास चितळे यांचा निरोप घेऊन आश्रमात गेलो. वाटले तयार भोजन मिळेल. परंतु महाराज कुणा यजमानासाठी पूजेत गुंतले होते. आमची दखल घेतली गेली नाही.

आश्रमाजवळच चितळे दांपत्य सध्या राहते. त्यांच्याकडे दाखल झालो. सुंदर भोजन झाले. गप्पागोष्टी झाल्या व आमचा इथेच मुक्काम करण्याचा निर्णय झाला.

बरेच दिवस झाले. कपडे साबणात घातले नव्हते. आज मात्र छान साबणात कपडे खळबळले व वाळत टाकले.

**रविवार दि. ३ फेब्रुवारी २०१३. दिवस ७० वा. बगलवाडा-अलिगंज**

थंडी कमी झाली आहे. बगलवाड्याहून परिक्रमा. कॉंक्रिट रस्त्याने पुढे निघालो. हरभऱ्याच्या शेतांमधून उतरलो ते एका नदीपाशी गुढघाभर पाण्यातून नदी पार केली. नदीचे नाव होते 'तेटन्होनी'. नदी ओलांडून आम्ही बिस्किटे खाल्ली. बरोबर बन्सा होता.

पुढील गावात चहा मागितला. मिळाला. शिवाय मोठेमोठे पौष्टिक दहा लाडू प्रसाद म्हणून मिळाले. आता कॉंक्रिट रस्ता नदीच्या अलीकडेच संपून पायरस्ता कधीच सुरू झाला होता. वाटेत चार लाडू दोघात खाऊन भूक

(पृष्ठ क्र. ३१ वर)

ज्येष्ठत्व केवळ वयामुळे नाही तर गुणांमुळे येते.

# ओळख वनस्पतींची
# मेडशिंगी

*'ओळख वनस्पतींची' या लेख मालेतील पाचवा भाग. 'मेडशिंगी' या वनस्पतीची वैशिष्ट्ये, त्याचे उपयोग, त्याची देखभाल या बाबींवर या लेखात प्रकाश टाकला आहे - संपादक*

मित्रांनो, जंगलात फिरतांना काही ओळखीची व बरीचशी अनोळखी मंडळी भेटत असतात. अनोळखी मंडळीत जसे विविध किटक आहेत तशी विविध झाडे व झुडुपेही आहेत; ज्यांची अजून ओळख झाली नाही म्हणून रुखरुख वाटत राहते. असेच एक बकरीच्या शिंगासारखे मुरडलेल्या ४५ ते ६० सें. मी. आकाराच्या चपट्या शेंगा असणारे झाड. जवळ जवळ वर्षभर या शेंगा त्या झाडावर असतात. पुरेशा जून झाल्या की त्या फुटून त्यामधून बिया बाहेर पडतात व शेंगांची टरफले मात्र कितीतरी दिवस झाडावरच असतात. जंगलात फिरताना मी अनेकदा हे झाड पाहिले. पण ओळख होत नव्हती. माझे कुतूहल वाढत होते. कोणते बरे झाड असावे हे? झाडावर चढून दोन शेंगा तोडल्या अन् परतिच्या प्रवासात काही गावकऱ्यांना त्या दाखविल्या तेव्हा त्यांच्याचकडून कळले त्या शेंगा होत्या मेडशिंगी या झाडाच्या. मेंडशिंगा, किती समर्पक नाव आहे. एडक्याची किंवा बकरीची शिंगे अशीच असतात ना मुरडलेली.



हे एक मध्यम उंचीचे झाड आहे. साधारण १० ते १५ मीटर उंच वाढणारे. भारतात पश्चिम घाटात विपुल प्रमाणात आढळते. पाने ८ ते १२ से.मी. लांब लंब गोलाकार व टोकाला दोन अर्धगोलांमध्ये दुभंगलेली समोरासमोर असणारी व संख्या अनियमित असलेली, रंग गर्द हिरवा, पाने गुळगुळीत झाडाचा संपूर्ण आकार उभट गोलाकार घुमट असलेला. या झाडाला एप्रिल, मे महिन्यात कातरलेल्या पाच पाकळ्यांची सुंदर पांढरी फुले येतात. फुले पेल्याच्या आकारातील; पण कडा मात्र पुढे येऊन मागे वळलेल्या फुगीर अशा. या फुलांना सुंदर मंद वास असतो. बरेच दिवस ही फुले झाडावर दिसतात. अगदी पावसाळा सुरू झाला तरी एखाद दुसरे फुल दृष्टीस पडतेच पडते. फुलांचा आकार वैशिष्ट्यपूर्ण असल्याने लक्षात राहण्यासारखा आहे.

खोड पांढुरक्या मातकट रंगाचे व खडबडीत. फांद्यांना नियमित असा आकार नसतो. पण फांद्या लवचिक असल्याने खाली झुकलेल्या व वाऱ्यासोबत डोलणाऱ्या, तसे मुद्दाम लक्षात ठेवावे असे नसले तरी त्याच्या औषधीगुणांमुळे ते सहज लक्षात राहते. बिग्नोनियंसी कुळातील या झाडाचे शास्त्रीय नाव आहे Dholichandrone falcata. आहे की नाही माणसाच्या नावाशी साम्य. मी लक्षात ठेवले ते याचे नाव कलकत्त्याचा धोलीचंद्र असं सुगम करून वनस्पतींची तसेच पक्षी व प्राण्यांची शास्त्रीय नावे सर्व जगात सारखीच असावी, तसेच एका जातीला एकच नाव असावे म्हणून जागतिक स्तरावर द्विस्तरीय नावे देण्याची पद्धत आखून देण्यात आली आहे. प्रादेशिक नावे कोणतीही असोत. शास्त्रीय नाव मात्र एकच असते. त्यामुळे शास्त्रीय नाव सांगितले तर जगातला कोणताही

(पृष्ठ क्र. ४० वर)

लहान मुलांमध्ये आढळणारी चौकसवृत्ती म्हणजे ज्ञानाची भूक होय.

# डिजिटल मार्केटिंग

*डिजिटल मार्केटिंगचे कार्य कसे चालते? त्याचे फायदे-तोटे काय आहेत? डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात भविष्यात काय घडेल? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला या लेखातून मिळणार आहेत - संपादक*

डिजिटल मार्केटिंग म्हणजे काय रे भाऊ? असे आता कोणीही विचारणार नाही, इतका हा शब्द लोंकाच्या तोंडी रुळू लागला आहे. फ्लिपकार्ट, ॲमेझोन, श-लरू, स्नॅपडील इ. कंपन्यांनी भारतातील ग्राहकांना आकर्षित केले आहे. डिजिटल मार्केटिंगला आपण अंकीय क्रय-विक्रय असेही म्हणू शकतो. पारंपरिक विपणन आणि डिजिटल विपणन यांच्या मूलभूत उद्देशात काहीच फरक नाही. कोणत्याही व्यवसायाचा उद्देश हा पैसा कमविणे हाच असतो. आज आपण इंटरनेटने एकमेकांना जोडलेले आहोत आणि म्हणूनच देवघेव करण्यासाठी देखील इंटरनेटचाच वापर मोठ्या प्रमाणावर करतो. देवघेव म्हणजेच विनिमय. इंटरनेट चलन विनिमयाबरोबरच मूल्य विनिमयाकरिता देखील परवानगी देते. इंटरनेटद्वारा वेळ, ग्राहकांचे लक्ष आकर्षित करणे आणि वस्तू व सेवांची जाहिरात करणे या स्वरूपात व्यावसायिकाला मूल्य प्राप्त करता येऊ शकते, तर वापरकर्त्यासाठी ते मूल्य मनोरंजन स्वरूपात जोडले जाऊ शकते. अशा या विनिमयाद्वारे एकाच वेळी दोन्ही पक्षांना लाभ होतो. म्हणजेच पारंपरिक विपणनाचा जो उद्देश आहे की ग्राहकांना आपल्या वस्तू व सेवांकडे आकर्षित करणे आणि त्या विकत घेण्याची इच्छा निर्माण करणे आणि त्या त्यांना विकणे अगदी तोच उद्देश डिजिटल विपणनाचा देखील आहे.

डिजिटल मार्केटिंगचे कार्य कसे चालते? त्याचे फायदे-तोटे काय आहेत? डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात भविष्यात काय घडेल? या सगळ्या प्रश्नांची उत्तरे आपण या लेखातून मिळविणार आहोत. सर्वप्रथम आपण इंटरनेट विपणन, ई-विपणन आणि डिजिटल विपणन या तीन संज्ञा समजून घेऊ. इंटरनेट विपणनात इंटरनेटचा वापर करून ग्राहक गरजा जाणून घेऊन त्याप्रमाणे वस्तू व सेवांची निर्मिती करून व्यवसायाचे उद्दिष्ट साध्य केले जाते; तर ई-विपणनात ICT आणि इंटरनेट तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहक आणि पुरवठादार यांना जवळ आणले जाते आणि त्यायोगे व्यवसायाची उद्दिष्टे साध्य केली जातात. उदा. वेबबेस तंत्रज्ञानाशी ई-मेल तंत्रज्ञान जोडणे, ज्यायोगे तुम्ही ग्राहकाच्या ई-मेलवर त्वरेने माहिती प्रतिसाद देऊन ग्राहकांचे समाधान करू शकता. डिजिटल विपणन ही संज्ञा या सगळ्यांना समाविष्ट करून घेणारी आहे. यात संकेतस्थळ तंत्रज्ञानाचा (web technology) किंवा ॲपचा वापर प्रामुख्याने होतो. त्याचबरोबर सोशल मिडिया, ई-मेल विपणन, ब्लॉगिंग इ. चा पण वापर होतो.

डिजिटल विपणनात वेबसाइट म्हणजे संकेतस्थळ महत्त्वाची भूमिका बजावते. एकवेळ वेबसाइट बनविणे सोपे पण सुयोग्य 'डोमेन नेम' निवडणे अवघड. सुयोग्य डोमेन नेम म्हणजे ज्यात तुमच्या कंपनीचे, ब्रँडचे, शहराचे असे नाव घेता येते. त्याची तुम्हाला नोंदणी करावी लागते. डोमेन नेम मध्ये शेवटी com, org, net, in असे असते पण इथून पुढे असे दिसले नाही तर वेबसाइट डोमेन नेम चुकीचे आहे असा ग्रह करून घेऊ नका. कारण इथून पुढे तुम्हाला वेगळ्या प्रकारची डोमेन नेम पाहायला मिळतील. आता वेबसाइट म्हणजे काय? वेबसाइट ही एखाद्या पुस्तकासारखी असते. जशी पुस्तकाला अनेक पृष्ठे असतात तशीच ती वेबसाइटवर पण असतात. या पृष्ठांवर आपण आपल्या संस्थेची माहिती मजकूर, चित्रे, फोटो, ॲनिमेशन, ऑडिओ, व्हिडिओ या सर्वांचा एकत्रित वापर

आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावेल. आपले सुख दगडात कोरा,
ते कोणीही खोडू शकणार नाही.

करून अतिशय आकर्षक पद्धतीने मांडू शकतो. या माध्यमातून आपण कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचू शकतो. याच वेबसाइटवर आपण मागणी नोंदविण्याची, ऑनलाइन मूल्य प्रदानाची (पेमेंट) आणि ग्राहक तक्रार -अभिप्राय नोंदवण्याची सुविधा देखील देऊ शकतो. तुमची वेबसाइट बघून, प्रॉडक्ट कॅटलॉग बघून ग्राहक तुमच्या व्यवसाय ठिकाणाला भेटही न देता घरात बसून ऑनलाइन वस्तू खरेदी करू शकतो.

डिजिटल विपणनात विविध तंत्रे वापरली जातात. सर्च इंजिन ऑप्टिमायझेशनचे (एसईओ) तंत्र जे आपण सर्रास वापरतो, उदा. आपण एखाद्या गावात नव्याने गेलो आणि तुम्हाला काही टीव्ही, फ्रीज अशा इलेक्ट्रॉनिक वस्तू घ्यायच्या आहेत तर तुम्ही काय कराल? तर इंटरनेटवर सर्च माराल, म्हणजे सर्च इंजिनमध्ये 'टीव्ही फ्रीज शोरूम्स इन रत्नागिरी (गावाचे जे नाव असेल ते)' असे टाकाल. यालाच 'की-वर्ड' असे म्हणतात. लगेचच सर्च इंजिन तुम्हाला की-वर्डशी सुसंगत असे काही परिणाम दाखवेल. या परिणामात आपली वेबसाइट सर्वात वर यावी याकरिता जे तंत्र वापरले जाते त्यालाच 'एसईओ' तंत्र म्हणतात.

पे-पर-क्लिक किंवा शोध जाहिरात (सर्च ॲडव्हरटाईज) तंत्रात, जेव्हा वापरकर्ता एखादा शब्द (की-वर्ड) सर्च इंजिनमध्ये टाकतो त्याला प्रतिसाद म्हणून काही परिणाम-पृष्ठे येतात. त्यात या जाहिराती असतात. जेव्हा वापरकर्ता त्या जाहिरातीत स्वारस्य दाखवितो आणि जाहिरात पाहतो त्यावेळी ज्याचे ते पृष्ठ असेल त्याला जाहिरातदार ठरावीक रक्कम देतो. उदा. आपल्या ब्लॉग पृष्ठावर आपण अशा प्रकारे जाहिराती दाखवू शकता आणि पैसे कमवू शकता.

ऑनलाइन जाहिरात तंत्र म्हणजे इंटरनेटवरील सर्व प्रकारांचा जाहिरातीसाठी वापर करणे. तुम्ही तुमची जाहिरात करण्यासाठी ईमेल, सोशल नेटवर्क, वेबसाइट, मोबाईल या सर्वांचा वापर करू शकता. या जाहिरातींचा मुख्य उद्देश ब्रँडची लोकप्रियता वाढविणे हा असतो.

संलग्न विपणन प्रणाली (Affiliate Marketing) ही एक परंपरागत विपणन प्रणाली आहे. जेव्हा कोणीतरी आपल्या शिफारसीवरून वस्तू/सेवा खरेदी करते तेव्हा आपल्याला काही कमिशन मिळते. हा  प्रकार ब्लॉगर्स मध्ये विशेष लोकप्रिय आहे. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की, हे ऑनलाइन घडते कसे? जेव्हा आपण आपल्या वेबसाइट किंवा ब्लॉगवर ज्या कंपनीची जाहिरात करत आहात किंवा वस्तू/सेवाविषयी माहीत देत आहात त्या कंपनीची 'साईन अप' होऊन ट्रॅकिंग लिंक घ्यायची, म्हणजे कंपनीच्या ट्रॅकिंग URL मध्ये तुमच्या वेबसाइट किंवा ब्लॉगचा URL येईल आणि कंपनी तुम्ही पाठविलेल्या प्रत्येक खरेदीदारामागे तुम्हाला काही कमिशन देईल. अट फक्त एकच. खरेदीदाराने ती वस्तू/सेवा तुम्ही शिफारस केल्यापासून ६० दिवसात खरेदी केली पाहिजे.

व्हिडिओ विपणन तंत्रात व्हिडिओ सामग्री (contents) किंवा पूर्ण व्हिडिओ जाहिरातीचा समावेश होतो. असे व्हिडिओ आपण यू-ट्यूब वर किंवा तत्सम प्रकारच्या वेबसाइटवर टाकून आपल्या ब्रँडची लोकप्रियता वाढवू शकतो आणि वापरकर्त्याला माहिती, मनोरंजन आणि प्रेरणा मिळू शकते. अशा तऱ्हेने दोन्ही पक्षांना याचे मूर्त मूल्य मिळू शकते. या तंत्राचा चांगला उपयोग आज अनेक उभरते कलावंत करीत आहेत. स्वत:च्या अभिनयाचे, गाण्याचे, संगीताचे अथवा तत्सम कलांच्या सादरीकरणाचे व्हिडिओ करून यू-ट्यूबवर टाकतात. त्यायोगे जगाला त्यांच्या कलेची ओळख होते आणि प्रसिद्धीही होते.

सोशल मिडिया हा सगळ्यात लोकप्रिय प्रकार आहे, ज्यावरून आपण मजकूर किंवा आवाजी अथवा दृश्य स्वरूपात विपणन करू शकतो. फेसबुक, ट्विटर या सारख्या सामाजिक मिडियाला ग्राहक व्युत्पन्न मिडिया म्हणतात.

कारण यात ग्राहकांचे सहभागीत्व थेट असते. या सामाजिक माध्यमांच्या पृष्ठावर आपण आपली जाहिरात करू शकतो आणि ग्राहक देखील आपले अभिप्राय या माध्यमातून देऊ (share) शकतात. यासाठी कंपनीचे स्वत:चे पृष्ठ असावे लागते उदा. फेसबुक पेज.

ई-मेल विपणन हा एक थेट विपणनाचा प्रकार आहे. यामध्ये आपण जाहिरात संदेश किंवा व्यावसायिक वितरण जास्तित जास्त लोकांपर्यंत पोहोचवू शकतो. फक्त उत्कृष्ट परिणाम साध्य करण्यासाठी आपणाकडे ग्राहकांचा ई-मेल डेटाबेस मोठ्या प्रमाणावर असला पाहिजे.

आपण एका नवीन क्रांतिपर्वाचे साक्षीदार आहोत. येणाऱ्या काळाच्या पोतडीतून कोणत्या अद्भूत गोष्टी बाहेर काढल्या जाणार आहेत याचा अंदाज सुद्धा बांधणे आज अवघड आहे. डिजिटल मार्केटिंग हे आपले भविष्य आहे. तर आपण त्याचे भविष्य काय सांगणार! आज आपण दिवसातला अधिकांश वेळ ऑनलाइन असतो आणि हे प्रमाण भविष्यात आणखी वाढणार आहे. आज नेस्लेने मॅगी वरच्या बंदीचा फायदा उचलत डिजिटल मार्केटिंग मधून पुनरागमन केले. वॉलमार्टने देखील काही प्रॉडक्ट डिजिटल विपणन तंत्राद्वारे विकण्याचा निर्णय घेतला आहे. नाइकी, ओरिओ यासारखे ब्रँड डिजिटल मार्केटिंग तंत्रात स्थिरावत आहेत. अनेक नामवंत कंपन्यांनी आपल्या जाहिराती सोशल मीडियावर करायला सुरुवात केली आहे. ही फक्त सुरुवात आहे. इथून पुढे सर्वच कंपन्यांना कमी अधिक प्रमाणात डिजिटल मार्केटिंग तंत्र आत्मसात करण्याशिवाय गत्यंतर नाही.

डिजिटल विपणनाचा मोठा फायदा असा होतो की, आजचा बाजार हा ग्राहककेंद्रीत आहे आणि ग्राहकांचे बदलते वर्तन, कृती, कृती मार्ग आणि त्यांचा अभिप्राय (त्यांच्या समान सवयी) या सगळ्यांची माहिती (deta) संगणकावर तयार होत जाते आणि क्लाउड कॉम्प्युटिंग तंत्रामुळे माहितीचा प्रचंड साठा तयार होतो (बिग डेटा तंत्रज्ञान) ती माहिती वापरून, त्याची सांख्यिकी तयार करून, त्याचे विश्लेषण करून, निष्कर्ष काढून त्याप्रमाणे वस्तू/सेवांत आवश्यक ते बदल त्वरेने करून ग्राहकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकतो. यामुळे ग्राहक प्रतिबद्धता पूर्वीपेक्षा जास्त शक्य झाली आहे. दुसरे असे की, ग्राहक ज्यावेळी वस्तू खरेदीचा निर्णय घेतो तेव्हा त्या वस्तुसंबधीची माहिती तो इंटरनेटवर सर्च मारूनच घेतो. त्यामुळे विविध वस्तूंची जाहिरात करायला हे तंत्र एकदम योग्य आहे. शिवाय आपले दुकान २४/७ उघडे राहते, ऑनलाइन असणारा ग्राहक केव्हाही वस्तू खरेदी करू शकतो. जागतिक बाजारपेठेत आपल्या पाऊलखुणा उठवायला भौगोलिक सीमारेषांचा अडथळा येत नाही. अत्यंत कमी गुंतवणुकीत व्यवसाय सुरू करता येवू शकतो. मोक्याची जागा, इमारत, फर्निचर, मालसाठा यात प्रचंड गुंतवणूक करावी लागत नाही. ग्राहकाला घरबसल्या खरेदी करता येते. त्याचा वेळ वाचतो. जसे याचे फायदे आहेत तशाच याच्या काही मर्यादा आहेत. एकतर यासाठी ग्राहकाला सतत ऑनलाइन ठेवायला हवे आणि वेबसाइट सतत अपडेट ठेवावी लागते. दुसरी गोष्ट अशी की इथे विश्वास निर्माण व्हायला वेळ लागतो. वैयक्तिक सहसंबंध (personal relations) निर्माण होत नाहीत. तरीही काळ कोणासाठी थांबत नाही, तंत्रज्ञानाची प्रगती होतच रहाणार. त्याच्याबरोबर आपल्याला चालावेच लागणार. किंबहुना काळाच्या पुढे दोन पावले राहा आणि निर्माण होणाऱ्या नवीन संधींचा - सुखसोयींचा यथायोग्य फायदा घ्या.

**डॉ. सौ. अनघा उदय गोखले**
वि. प्र. मं. चे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर.
e-mail : anagha.gokhale@vpmmpcoe.org
भ्रमणध्वनी-९८५०८९०३८२

●●●

# काशी के कंकर शिव-शंकर - काशी महात्म्य

*हिंदू धर्मियांचे पवित्र स्थळ वाराणसी (काशी) विषयी माहिती देणारा लेख - संपादक*

हिंदू धर्मियांची पवित्र स्थळे व तीर्थक्षेत्रे संपूर्ण भारतभर विखुरलेली आहेत. भारतातील अनेक शहरे अती प्राचीन असून त्यांचे हिंदू धर्मीयांच्या धार्मिक जीवनात अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. अशाच एका शहरांपैकी 'वाराणसी' हे शहर होय. हे शहर उत्तर प्रदेशात असून गंगा नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे. या शहरास 'बनारस व काशी' या नावानी देखील ओळखले जाते. काशी हे शहर हिंदू धर्मीयांच्या अत्यंत पवित्र सात शहरांपैकी एक आहे. ह्या सात ठिकाणांपैकी इतर सहा ठिकाणे - अयोध्या, मथुरा, हरिद्वार, कांची, उज्जैन व द्वारका ही होत. प्रत्येक भाविक हिंदूची अशा धारणा असते की, जीवनात एकदा तरी काशीची यात्रा करावी व विश्वनाथाचे (महादेवाचे) दर्शन घ्यावे व तेथे पवित्र गंगा नदीत स्नान करावे.

हिंदूमध्ये साधारणतः अशी धारणा आहे की, काशीतील दशाश्वमेध तीर्थावर आंघोळ केल्यास दहा अश्वमेध यज्ञ केल्याचे पुण्य मिळते. मत्स्य पुराणात अविमुक्त वा काशी या तीर्थाचे वर्णन आलेले आहे. प्राचीनकाळापासून काशी शहराकडे अनेक भारतीय राजांनी व राजघराण्यांनी मोठ्या भक्तीभावाने लक्ष दिल्याचे आढळते. अशाच एका राजघराण्यांपैकी उत्तर भारतातील गढ़वालांचे राजघराणे होय. १२ व्या शतकातील उत्तर भारतातील गढवाल राजा गोविंदचंद्र याचा मुख्यमंत्री लक्ष्मीश्वर हा एक विद्वान होता. त्याने हिंदूधर्मातील 'राजधर्म', 'दानं', 'व्रत श्राद्ध', 'तीर्थयात्रा' इत्यादी संकल्पनांवर प्रकाश टाकणाऱ्या पुस्तकांची निर्मिती व जंत्री उपलब्ध करून दिलेली आढळते. त्याने उत्तर भारतातील विविध तीर्थक्षेत्रांची सुरेख माहिती दिलेली होती व काशीमध्ये जवळ-जवळ तीनशे पन्नास मंदिरांमध्ये तीर्थे असल्याची नोंद केली आहे. उत्तर भारतातील गढवाल राजांच्या दृष्टीने वाराणसी शहराचे महत्त्व फार होते. येथे गढवाल राजवंशाच्या अनेक राजांनी पवित्र गंगा नदीत आंघोळ केल्याचे व भूमीदान व धन-दान केल्याचे उल्लेख आढळतात.

वाराणसी वा काशी हे महादेव व पार्वतीचे कायमस्वरुपी वास वा वास्तव असणारे ठिकाण आहे अशी हिंदू धर्मीयांची ठाम धारणा आहे. हिंदू धर्मातील पुराण कथांप्रमाणे 'दक्षा' च्या यज्ञात सती मातेने प्राणत्याग केला व त्यानंतर महादेवाने वीरभद्रास आपल्या जटेतून निर्माण केले. वीरभद्राने आपल्या 'शिव-गणांसह' दक्षाच्या नगरीत प्रवेश करून नासधुस करण्यास सुरुवात केली. शेवटी दक्षाचे शीर देखील धडापासून वेगळे करण्यात आले. ह्या घटनेनंतर महादेवाचा राग शांत झाल्यावर 'दक्षास' बोकडाचे तोंड लावण्यात आले. 'सती' च्या अंतानंतर शिवा-महादेव पुन्हा वैराग्यात गेले व योगात बुडून गेले. यानंतर आदिशक्तीने हिमालय पर्वत व त्याची पत्नी मेना यांच्या पोटी जन्म घेतला व या जन्मात ती पार्वती या नावाने ओळखली जाऊ लागली. या पार्वती मातेस अगदी लहानपणापासूनच शिवाविषयी अतुल्य ओढ होती. असे म्हटले जाते की, पार्वती मातेने महादेवास प्रसन्न करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. शेवटी प्रयत्नांची पराकाष्ठा करून शंकरास आपल्याबरोबर विवाह करण्यासाठी राजी करून घेतले.

महादेवाचा निवास साधारणतः हिमालयातील 'कैलास' पर्वतावर असतो अशी हिंदूंची धारणा आहे.

शंकराची इतर स्थाने व तीर्थक्षेत्रे बहुधा पर्वत व डोंगरांमध्येच असतात. उदाहरणच द्यायचे झाले तर महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर (नाशिक जिल्ह्यातील - सह्य पर्वत रांगांमध्ये), भीमाशंकर (पुणे - जिल्ह्यातील - सह्य पर्वत रांगांमध्ये) केदारनाथ, अमरनाथ (हिमालय पर्वत रांगांमध्ये) ह्या पवित्र ठिकाणांचा उल्लेख करावा लागेल. देशभर इतरत्र असलेली महादेवाची अनेक मंदिरे व स्थाने साधारणतः अशीच जंगल टेकड्यांवर असलेलीच आढळतात.

हिमालय व मेनेस आपली कन्या पार्वती हिस कैलासासारख्या अतिशय थंड व कायम बर्फाळलेल्या ठिकाणी पाठवणे जड जात होते. त्यामुळेच त्यांनी आपला जावई शंकरास पार्वतीसाठी चांगल्या निवासस्थानाची व्यवस्था करण्यास सांगितले अशी धारणा आहे. त्यामुळे महादेवाने संपूर्ण पृथ्वीचा शोध घेऊन आपल्या व पार्वतीच्या वास्तव्यासाठी वाराणसी या सुंदर ठिकाणाची निवड केली. असे म्हटले जाते की, वाराणसी येथे शिवाचे कायम वास्तव्य असते. त्यामुळेच महादेवाने या शहरास 'अविमुक्त' असे नाव दिले आहे असे भक्त मानतात. कारण महादेवाने हे ठिकाण कधीच न सोडण्याचे व याचे कुठल्याही परिस्थितीत रक्षण करण्याचे स्वतःच म्हटले आहे अशी एक परंपरा आहे. अगदी प्रलयकाळी देखील शंकर वाराणसीस आपल्या त्रिशूलावर उचलून धरतो व त्यामुळे संपूर्ण जग नष्ट झाले तरी वाराणसी हे शहर नष्ट होत नाही अशी हिंदू धर्मियांची ठाम श्रद्धा आहे. वाराणसी या शहरात महादेवाची अनेक मंदिरे असून येथे गेल्यास बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा केल्याचे पुण्य लाभते असे भक्तगण मानतात. वाराणसीचे संपूर्ण क्षेत्र महादेवापासून निघालेल्या प्रकाश व ऊर्जेने पावन झालेले असून त्यामुळेच या शहरास 'काशी' (Luminous) 'प्रकाशाचे शहर' असे देखील म्हटले जाते. अगोदर नमूद केल्याप्रमाणे वाराणसीस बनारस वा काशी देखील म्हटले जाते. सृष्टी निर्माण करताना शिवा (महादेव) व आदिमाता शक्तीने काशीपासून सुरुवात केली अशी हिंदूंची धारणा आहे. त्यामुळेच प्रलय आल्यानंतर शिवाने काशीस आपल्या त्रिशूलावर उचलेले असे हिंदू मानतात. काशी हे ठिकाण कधीच उद्ध्वस्त होत नसल्यामुळे ते 'काळा' पेक्षाही श्रेष्ठ असा महिमा आहे. काशीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे येथे गंगा नदीच्या किनाऱ्यावर अनेक घाट आहेत व देशभरातून अनेक भक्त येथे गंगास्नानासाठी येत असतात. हिंदूंची अशी धारणा आहे की, काशीमध्ये गंगास्नान केल्यानंतर सर्व पापांमधून मुक्ती मिळते व पुण्य लाभते. भारतभरातून विविध प्रांतातील भाविक काशीला जात असतात. असे म्हटले जाते की, काशीमध्ये हिंदी भाषेपेक्षा इतर प्रांतातील भाषाच जास्त प्रमाणात कानावर पडतात. अगदी तामिळनाडू व बंगालसारख्या दूरवरच्या प्रदेशांतून येथे भाविक आलेले आढळतात. याचे कारण म्हणजे हिंदू भाविकांची अशी निस्सिम श्रद्धा आहे की, महादेव व माता शक्ती यांचा निवास आजही काशीमध्ये असतो. येथे मरण आल्यानंतर जन्म-मृत्युच्या फेऱ्यातून मुक्ती मिळून मनुष्यास मुक्ती प्राप्त होते असे उल्लेख आपणास हिंदू धर्मग्रंथांत आढळतात. त्यामुळे अनेक लोक तर काशीमध्ये प्राणत्याग करण्यासाठी येत असतात. काशीमध्ये अनेक मंदिरे असून सर्वात प्रसिद्ध असे शंकराचे विश्वेश्वरनाथाचे मंदिर आहे. शंकराच्या अनेक नावांपैकी विश्वेश व विश्वनाथ ही देखील नावे होत. त्यामुळेच काशी येथील महादेवाच्या जगप्रसिद्ध मंदिरास विश्वेश्वरनाथाचे मंदिर असे म्हणतात. काशीमध्ये शंकराच्या मंदिरांसोबतच विष्णू, राम, हनुमान, इत्यादी देवतांची मंदिरे देखील आहेत. असे असून देखील काशी हे खऱ्या अर्थाने शंकराचेच शहर म्हणावे लागेल. कारण हिंदीमध्ये तर असे म्हटले जाते की, 'काशी के कंकर(ड) शिव शंकर' या हिंदी वाक्याचा अर्थ असा होतो की, काशीतील प्रत्येक खडा व दगड म्हणजे शंकर होय. काशी म्हणजे शंकर असे आपसूकच कोणत्याही हिंदूच्या मनात येते. कारण आपल्या हिंदू धर्मीयांच्या मनात काही शहरे व तेथील देवता यांचे समीकरण पक्के बसलेले आहे. नव्हे अनेक शहरे व ठिकाणे

तेथे एका विशिष्ट देवतेने केलेल्या वास्तव्यामुळे वा तत्सम देवतेच्या लिलांशी संबंधित आहेत. त्यामुळे अशा विशिष्ट शहरांचे वा ठिकाणांचे नाव घेतले की, त्या देवतेचे चित्र पुढे उभे राहते. उदाहरणच द्यावयाचे झाले तर अयोध्या, मथुरा, नाशिक (पंचवटी), द्वारका, तिरुपती इत्यादी ठिकाणांची नावे आली की, विष्णू वा त्याच्या राम, कृष्ण या अवतारांची आठवण येते. या ठिकाणांशी राम व कृष्णाच्या अनेक लीला संबंधित आहेत. माहूर, नाशिक (सप्तश्रृंगी), इत्यादी ठिकाणे शक्तीपीठांची आठवण करून देतात. त्यामुळेच काशी शहर म्हटले की, महादेवाचे शहर असे म्हणतात. काशी प्रमाणेच सोमनाथ (गुजरात), श्रीशैवशैलम् (आंध्र प्रदेश), केदारनाथ (उत्तराखंड), अमरनाथ (काश्मीर) इत्यादी स्थाने देखील महादेवाची स्थाने म्हणून पूर्ण भारतभर प्रसिद्ध आहेत व या सर्व ठिकाणी संपूर्ण भारतातून भक्त येत असतात.

काशीतील ज्योतिर्लिंग हे फक्त विश्वनाथ मंदिरापर्यंतच सीमित नसून जरी त्या ठिकाणी 'वैश्विक प्रकाशाचे' (शिवलिंग म्हणजे - वैश्विक प्रकाशाचे प्रतीक मानले जाते.) मूळ असले तरी जवळ - जवळ दहा मैलांच्या पंचक्रोशीतला प्रदेश पवित्र मानला जातो व या संपूर्ण परिसरात शिवाने निर्माण केलेल्या वैश्विक प्रकाशाचा परीघ पसरलेला आहे अशी भाविकांची श्रद्धा आहे.

काशीमध्ये बारा ज्योतिर्लिंगांव्यतिरिक्त चार धाम (बदरीनाथ, पुरी, रामेश्वरम् व द्वारका), भारतातील सात पवित्र शहरे (अयोद्धा, मथुरा, हरद्वार, काशी, कांची, उज्जैन व द्वारका) सात पवित्र नद्या तसेच इतर तीर्थस्थाने व तीर्थक्षेत्र एकवटलेली आहेत. त्यामुळेच काशीची तीर्थयात्रा केल्यास भारतातील सर्व पवित्र तीर्थक्षेत्रांची यात्रा केल्याचे पुण्य लाभते असे भक्त लोक मानतात. वाराणसी वा काशीतील गंगा नदीच्या किनाऱ्यावरील भाविकांचे दृष्य विलोभनीय असते. अगदी पहाटे पासून (तांबडे फुटल्यापासून) भक्तलोक गंगेच्या अनेक घाटांवर पवित्र स्नानाकरिता येत असतात. मोठ्या भक्तिभावाने ते हाताच्या ओंजळीत पाणी घेऊन सुर्याला नमन करून व इतर देवतांची नावे घेत तर्पण करत असतात. हे पवित्र स्नान घेत असताना भाविक गायत्री मंत्राचा जागर देखील करत असतात. हे झाले काशीच्या घाटातील सकाळचे दृष्य. संध्याकाळ झाल्यानंतर शंकराची व गंगा मातेची पूजा केली जाते. गंगेस फुलं व तेलाने जळणारे दिवे अर्पण केले जातात व हजारो भक्त 'हर हर महादेव शंभो ! काशी विश्वनाथ गंगे !' ह्या पवित्र घोषणेचा उद्घोष करतात.

वाराणसी वा काशीमध्ये गंगा नदीच्या किनाऱ्यावर सत्तरहून अधिक आंघोळीचे घाट आहेत. ह्या घाटांवर काशी शहरातील अनेक लोक स्नान करत तर असतातच, मात्र भारतभरातून आलेले अनेक भाविक देखील स्नान करत असतात. येथील स्नान हे भारतवर्षातील सर्वात पवित्र स्नान मानले जाते. काशी शहरांत गंगा नदीच्या किनाऱ्यावर अनेक मंदिरे आढळतात. ह्यापैकी पुष्कळ मंदिरे ही महादेवाची मंदिरे आहेत. काशीत मंदिरांसोबतच आश्रम देखील मोठ्या प्रमाणात आहेत. या आश्रमांमधून अध्यात्माचे व योगाचे शिक्षण दिले जाते. दररोज सकाळी येथील विद्यार्थी घाटांवर गंगा स्नान करतात व तदूनंतर आपल्या अध्यनास सुरुवात करतात. येथे योगाचा अभ्यास करण्यास भारत भरातूनच नव्हे तर संपूर्ण जगातून अनेक लोक येत असतात. महादेवाची ओळख सर्वश्रेष्ठ 'योगी' म्हणून देखील आहे. त्यामुळे त्याच्या नेहमीच वास असणाऱ्या 'काशी' या ठिकाणी येऊन योगविद्या शिकणे ही भाविकांसाठी एक वेगळीच पर्वणी ठरते.

ह्या अलौकिक शहराचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे येथे मंदिरे व आंघोळीच्या घाटांसोबतच स्मशान-घाट देखील आढळतात. गंगानदी किनाऱ्यावरील अशाच स्मशान घाटांपैकी हरिश्चंद्र घाट व मनिकर्णिका घाट हे दोन घाट सर्वात जास्त प्रसिद्ध आहेत. काशी शहराचे हे सर्वात आगळे वेगळेपण आहे असे म्हणावे लागेल. संपूर्ण

भारत वर्षात स्मशान हे गावाच्या बाहेर व प्रामुख्याने दक्षिण दिशेस (या दिशेस मृत्यूचा देव 'यम' असतो अशी हिंदूंची सर्वसाधारण भावना आहे) असते. त्याचप्रमाणे शहरी वस्तीत देखील जेथे निवासी वस्त्या दूर असतात तेथे स्मशान बांधण्याचा नगरपालिका व महानगरपालिकांचा प्रयत्न असतो. वाढत्या शहरीकरणामुळे व त्यामुळे उद्‌भवणाऱ्या जागेच्या अभावामुळे हल्ली शहरी भागात काही ठिकाणी स्मशाने मानवी वस्तींच्या जवळच असल्याची जाणवते. मात्र, एकंदरीतच स्मशाने मानवाच्या वास्तव्याच्या ठिकाणापासून दूर असावीत असा भारतातील सर्वसामान्य दंडक आहे. या नियमास एकच अपवाद म्हणजे 'काशी' हे शहर म्हणावे लागेल. येथे मंदिरे व स्मशानघाट दाट मानवी वस्तीत एकत्रच असल्याची वा नांदत असल्याची आपणास दिसतात. याचे अजून एक कारण म्हणजे शंकराचा वास हा स्मशानात देखील असतो असे हिंदू मानतात. तंत्र पंथातील अनेक भक्त तर स्मशानात रात्री शंकराची आराधना व पूजा-अर्चा करतात असा समज आहे. मनुष्य, मृत्यूनंतर इहलोक सोडून जाताना व अनंतात विलीन होताना महादेव त्याची साथ करीत असतो व त्यामुळेच तो सर्वश्रेष्ठ देव देखील ठरतो अशी शिव भक्तांची ठाम श्रद्धा आहे.

वाराणसी हे शहर अती प्राचीन असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. वाराणसी हे शहर गेल्या अडीच हजार वर्षांपासून वाराणसी या नावाने ओळखले जाते. इसवी सनापूर्वीच्या ६ व्या शतकापासून या शहराचा इतिहास ज्ञात आहे. एवढ्या हजारो वर्षांचा वारसा असणारे व तो जपून ठेवणारे 'वाराणसी' हे जगातील एकमेव शहर होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळेच वाराणसीची तुलना अनेकदा जेरुसलेम (इस्रायल मधील एक प्राचीन शहर - हे शहर ज्यू, ख्रिस्ती व मुस्लिम ह्या तिन्ही धर्मांच्या बांधवांसाठी पवित्र आहे.) अँथेन्स (पूर्व युरोपातील ग्रीस या देशातील प्राचीन शहर), पेकिंग (सध्याचे बीजिंग हे शहर 'चीन' या देशाची राजधानी देखील होय.) ह्या जगातील इतर प्राचीन शहरांशी केली जाते. ही शहरे देखील वाराणसी प्रमाणे अती प्राचीन असून त्याकाळापासून ते आजतागायत येथे मानवाचे सतत वास्तव्य असून या शहरांचे पावित्र्य, धार्मिक परंपरा व वारसा हजारो वर्षांपासून जपलेला आहे. असे असले तरी वर नमूद केलेल्या कोणत्याही शहरापेक्षा 'वाराणसी' चे हिंदू धर्मीयांच्या जीवनात असलेले स्थान, श्रद्धा व हे शहर व हिंदूचे जीवन किती एकरूप झालेले आहे याची तुलना जेरुसलेम, अँथेन्स व पेकिंग बरोबर करता येणार नाही. इंग्रजीमध्ये असे म्हटले जाते की, "You have to put yourself in his or her shoe" - याचा अर्थ तुम्ही स्वतःला तत्सम व्यक्तीच्या जागी ठेवून पाहा तरच तुम्हाला त्या व्यक्तीचे मत, विचार व एकंदरीतच म्हणणे काय आहे ते पटेल. याच उक्तीप्रमाणे, 'वाराणसी'चे माहात्म्य व धार्मिक महत्त्व जाणून घेण्यासाठी 'हिंदू' म्हणूनच जन्माला यावे लागते असे म्हणणे मुळीच वावगे ठरू नये. याचे कारण म्हणजे, भारतातील सर्व प्रांतातील, सर्व सामाजिक स्तरातील, श्रीमंत, गरीब, सुशिक्षित, निरक्षर इत्यादी विविध प्रकारची पार्श्वभूमी असणाऱ्या धार्मिक हिंदूंना वाराणसी विषयी समान आस्था व भक्तीभाव असतो. एखाद्या ठिकाणावरील एवढी श्रद्धा व भक्तीभाव जगाच्या पाठीवर इतरत्र आढळणे विरळच असेल. त्यामुळेच वाराणसी हे शहर पवित्र तर आहेच मात्र, अतुलनीय देखील आहे. असे म्हटले जाते वाराणसीस अनेक ऋषींनी व साधु-संतांनी भेटी दिलेल्या आहेत. यात उल्लेखनीय भेट ही हिंदू धर्माचे खऱ्या अर्थाने पुन्हा एकदा पुनर्जीवन करणारे आदी शंकराचार्य यांची भेट होय. आदी शंकराचार्य इसवीसन ८०५ च्या आसपास काशीस आले होते असे इतिहासकारांचे मत आहे. त्यांनी सारंगनाथ नामक शिव मंदिर बांधले. वाराणसी ह्या शहरास हिंदू धर्मीयांच्या महान हिंदू ऋषी व मुनींप्रमाणे बौद्ध धर्माचे संस्थापक महात्मा गौतम बुद्ध व जैन धर्माला खऱ्या अर्थाने धर्माचे अधिष्ठान प्राप्त करून देणारे, जैनांचे चोविसावे तीर्थंकर

महात्मा महावीर जैन यांनी देखील भेट दिल्याचे दाखले आढळतात. त्यामुळेच हिंदू धर्मीयांप्रमाणेच बौद्ध व जैन बांधवांच्या दृष्टीने देखील वाराणसी हे शहर महत्त्वाचे ठरते.

हिंदू बांधवांसाठी काशीची यात्रा एवढी विशेष आहे की, येथे आल्यानंतर हिंदूंच्या सर्व देवतांचे दर्शन घेतल्याचे पुण्य लाभते. काशीमध्ये हिंदू धर्मीयांच्या चार धाम (बदरीनाथ, पुरी, रामेश्वरम् व द्वारका), सात पवित्र ठिकाणे (अयोध्या, मथुरा, हरद्वार, काशी, कांची, उज्जैन व द्वारका) आठ भैरव, नऊ गौरी, नऊ दुर्गा, नऊ ग्रह, विष्णूचे सर्व अवतार, बारा ज्योतिर्लिंग, तेरा नरसिंह, सोळा केशव, छप्पन्न विनायक व चौसष्ट योगिनींचा वास येथे असतो, असे हिंदू धर्मीय मानतात. त्यामुळेच, काशीची यात्रा केल्यानंतर ह्या सर्व ठिकाणांचे व देवतांचे दर्शन केल्याचे पुण्य मिळते असे हिंदू मानतात.

काशीमध्ये येणाऱ्या भक्तांनी काशी पुण्यक्षेत्राच्या विविध यात्रा कराव्यात असे अपेक्षित आहे. ह्या यात्रा पुढीलप्रमाणे आहेत - नित्य यात्रा, पंचतीर्थ यात्रा, अर्थगृही यात्रा, पंचक्रोशी यात्रा, अष्ट महालिंग यात्रा, सप्तर्षी यात्रा, एकादश महारुद्र यात्रा, द्वादश आदित्य यात्रा, बेचाळीस महालिंग यात्रा, छप्पन्न विनायक यात्रा, सप्तपुरी यात्रा, चौसष्ट योगिनी यात्रा, बारा ज्योतिर्लिंग यात्रा इत्यादी.

काशीचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे या पवित्र ठिकाणाची हिंदू व बौद्ध परंपरेत विविध नावे आहेत. हिंदू पुराणांमध्ये काशीच्या विविध नावांचा उल्लेख पुढीलप्रमाणे आहे - वाराणसी, मोक्ष प्रकाशिका, अविमुक्त, आनंदकानन, महास्मशान, रुद्रवास, आनंदरूप, शंकरपुरी, शिवपुरी, शिवराजधानी, श्रीनगरी, गौरीमुख, अपूर्णभाव भूमी, तपस्थली, महापुरी व धर्मक्षेत्र. बौद्ध परंपरेमध्ये काशीचा उल्लेख काशीनगर, काशीपूर, काशीग्राम, बनारशी, सुरुंधन, सुदर्शन, ब्रह्मवद् दन, पुष्पवती, रामयानगर, मौलिनी, केतुमती व ज्ञानशीला या नावांनी येतो. पतंजलींच्या 'महाभाष्यात' वाराणसीचा उल्लेख 'जीतवारी' असा येतो. हिंदूधर्मीयांमध्ये विविध पवित्र व धार्मिक स्थळांच्या तिर्थयात्रेस अनन्यसाधारण महत्त्व आहे व सर्व तीर्थयात्रांपैकी काशी यात्रेस उच्चतम स्थान आहे. भारतातील थोरांना व अगदी लहान मुलांना देखील काशी विषयी व ह्या ठिकाणाच्या महात्म्यांविषयी माहिती असते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही. काशी महात्म्यांविषयीची माहिती आपणांस पुराणांमध्ये व प्रामुख्याने स्कंद पुराणातील 'काशी खंडात' व ब्रह्मवैवर्त पुराणातील 'काशी रहस्यात' मिळते.

वाराणसी शहर म्हणजे एका अर्थाने संपूर्ण भारताचे दर्शन होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या पवित्र शहरात सध्या हिंदू बांधवांसोबतच मुस्लिमांची देखील लक्षणीय संख्या आहे. काशीचा उल्लेख काही मुस्लीम ग्रंथांमध्ये मोहम्मदाबाद असा आलेला आहे. स्थानिक हिंदू-मुस्लिमांसोबतच वाराणसीत भारतभरातून (उत्तर, पश्चिम, दक्षिण व पूर्व ) विविध राज्यातील हिंदू भाविक मोठ्या प्रमाणात आढळतात. येथे हिंदी भाषिक, मराठी भाषिक, तामीळ बांधव, बंगाली बांधव इत्यादी विविध भागांतील भारतीय हिंदू सततपणे येत असतात. महाराष्ट्रातील तर अनेक राजघराण्यांची पूजा सांगणारे विद्वान पंडित काशीत होते व हे पंडित तत्सम राजांच्या नावाने पवित्र काशीमध्ये पूजा-अर्चा करत असत. अगदी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने काशीचे प्रसिद्ध 'गागाभट्ट' नामक विद्वान पंडित पूजा-अर्चा करत असत असे अभ्यासकांचे मत आहे. याच गागाभट्टांनी शिवरायांचा राज्याभिषेक शास्त्र शुद्धपद्धतीने केला होता. पुढे पेशवाईत देखील पेशव्यांच्या वतीने काशीत पूजा-अर्चा करणारे पंडित असत. पेशवे स्वतः चित्तपावन (कोकणातील) ब्राह्मण असल्यामुळे त्यांची तर काशी या पवित्र क्षेत्रावर निस्सीम श्रद्धा होती.

शिवाजी महाराजांना मुघल बादशहा औरंगजेब याने

जिथे मोल जाणत नाही तिथे शब्द टाकू नये.

आग्रा येथे नजरकैद करून ठेवले होते व महाराजांनी मुघलांच्या हातावर तुरी देऊन या कैदेतून सुटका करून घेतली होती. ही ऐतिहासिक घटना सर्वश्रुत आहे. नजरकैदेतून बाहेर पडल्यानंतर महाराजांनी आपली वेशभूषा व केशभूषा बदलत मजल-दर-मजल शिवरायांनी करत दख्खन गाठले होते. ही इतिहासातील अतिशय विलक्षण अशी घटना इसवीसन १६६६ मध्ये घडली होती.

शिवराय दख्खनेत परत येत असताना काही काळ त्यांनी वाराणसीत आश्रय घेतला होता. ह्याची खबर औरंगजेबाला लागली व ह्या घटनेनंतर जवळ-जवळ तीन वर्षांच्या कालावधीने औरंगजेबाने बनारस मधील अनेक मंदिरे उद्ध्वस्त करण्याचे फर्मान सोडले. त्यातच येथील प्रसिद्ध असे विश्वनाथ मंदिर देखील उद्ध्वस्त करण्यात आले. काशीचे सध्याचे विश्वनाथ मंदिर इसवीसनाच्या अठराव्या शतकात पुन्हा नव्याने बांधण्यात आले व याचे श्रेय इंदौरच्या प्रसिद्ध होळकर मराठा सरदार घराण्यांतील महाराणी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकरांना जाते. अहिल्याबाईंनी संपूर्ण भारतभर अनेक देवालये उभारली आहेत हा इतिहास सर्वज्ञात आहे. अहिल्याबाईंचे प्रत्येक हिंदूंने शतशः ऋण मानले पाहिजेत. कारण त्यांच्यामुळेच विश्वनाथ मंदिर पुन्हा एकदा पाहण्याचा आपणांस योग आला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. औरंगजेबाने वाराणसीचे नामांतर मोहम्मदपूर असा करण्याचा देखील प्रयत्न केला होता असे आढळते.

इसवीसन अठराव्या शतकात मराठ्यांनी व प्रामुख्याने पेशव्यांनी बनारस वा वाराणसीचा एक धार्मीक स्थळ म्हणून प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. अगोदर नमूद केल्याप्रमाणे अहिल्याबाई होळकरांनी विश्वनाथ मंदिराचे पुनर्निर्माण वा जिर्णोद्धार केला. पेशव्यांची तर काशी, प्रयाग व गया ही उत्तर भारतातील हिंदूंची धार्मीक स्थळे आपल्या ताब्यात राहावीत अशी नेहमीच इच्छा व मनीषा होती. काशीतील प्रसिद्ध पंचगंगा घाट बांधण्यासाठी थोरल्या बाजीराव पेशव्यांनी (१७२०-१७४० - पेशवे पदाचा कालावधी) मदत केली होती असे दाखले सापडतात.

थोरल्या बाजीरावांच्या मातोश्री इसवीसन १७३५ मध्ये काशीला तीर्थयात्रेसाठी आल्या होत्या व मुक्त हस्ताने पुरोहितांना दान दिले होते. त्यापूर्वी इसवीसन १७३४ मध्ये नारायणराव दीक्षित पाटणकर व त्यांचे चिरंजीव बाळकृष्ण दीक्षित हे जवळ-जवळ १२०० भाविकांसह बनारसमध्ये येऊन स्थायिक झाले होते. ह्याच नारायणराव दीक्षितांच्या पुढाकाराने काशीतील प्रसिद्ध असे ब्रह्म घाट, दुर्गा घाट व त्रिलोचन घाट बांधण्यात आले होते. राघोबा दादांचे पुत्र अमृतराव पेशवे हे देखील इसवीसन १८०३ मध्ये बनारसमध्ये आपल्या समर्थकांसह येऊन स्थायिक झाले होते. अशा तऱ्हेने मराठ्यांचा बनारस वा काशीशी फार जवळचा व जिव्हाळ्याचा संबंध होता हे अधोरेखीत होते.

काशी हे पूर्वीपासून भारतातील एक विद्येचे व धार्मिक अभ्यासाचे केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. काशी स्थित व मुळात काशीच्या बाहेरून आलेल्या व तेथे स्थायिक झालेल्या अनेक विद्वानांनी वेद, पुराणे, तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, आयुर्वेद, योग, तंत्र इत्यादी ज्ञानशाखांचा अभ्यास केलेला जाणवतो. महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायातील लोकप्रिय संत एकनाथ महाराजांनी देखील आपला मराठीतील एकनाथी भागवत हा ग्रंथ काशीमध्ये काहीकाळ राहून लिहिला होता असे दाखले आढळतात. ह्या ग्रंथाचे लेखन पूर्ण झाल्यावर काशीकरांनी एकनाथांच्या प्रखर बुद्धिमत्तेने प्रभावीत होऊन नाथांची हत्तीवरून मिरवणूक काढली होती. मध्ययुगीन काळात काही मुस्लीम राज्यकर्त्यांनी वाराणसीची नासधूस करण्यास व पंडितांची अवहेलना व मानहानी करण्यास सुरुवात केल्यानंतर अनेक विद्वान वाराणसी सोडून निघून जाऊ लागले. मात्र, जेव्हा मुस्लीम अंमल दक्षिणेपर्यंत जाऊन पोहोचला तेव्हा हिंदू विद्वानांचा वाराणसी वा काशीला येऊन स्थायिक होण्याचा

ओघ वाढला. या काळात पंजाब, काश्मीर, महाराष्ट्र, पश्चिम भारत व दक्षिण भारतातील विविध ठिकाणांहून अनेक विद्वान पंडित काशीला गेले व त्यांनी तेथील ज्ञान परंपरा पुनर्जिवित केली असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

काशीतील काही प्रसिद्ध पंडितांपैकी नारायण भट्ट (१५१४-१५९०), मधुसूदन सरस्वती (१६२७-१६७०), नारायण दीक्षित व दिनकर अण्णा जोशी यांचा उल्लेख आवर्जून करावा लागेल. ह्या विद्वानांपैकी अठराव्या शतकातील नारायण दीक्षितांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. कारण ते एक महान विद्वान व अध्यात्मिक व्यक्ती तर होतेच, तसेच ते महाराष्ट्रातील मर्दानी शूर योद्धा व थोर शासक थोरले बाजीराव पेशवे यांचे गुरू होते. बनारस शहराशी ते एवढे एकरूप झाले होते की, तेथील एका परिसरास 'नारायण दीक्षित मोहल्ला' असे नाव देण्यात आले आहे.

अशा तऱ्हेने महाराष्ट्राचा बनारस वा काशी या शहराशी फार जिव्हाळ्याचा संबंध आहे हे सिद्ध होते. काशी हे हिंदू धर्मीयांसाठी तर जगाच्या पाठीवरील सर्वात पवित्र ठिकाण आहेच मात्र अगोदर नमूद केल्याप्रमाणे ह्या शहराचा इतिहास जवळ-जवळ ३००० वर्षे एवढा जुना आहे. एवढ्या हजारो वर्षांपासून येथे मानवी संस्कृती वावरत आहे. त्यामुळे ह्या शहराविषयी भारतातील व परदेशातील देखील अनेक विद्वानांना व अभ्यासकांना फार आदर व आकर्षण आहे. त्यामुळेच १९ व्या शतकातील बनारस येथील ख्रिस्त धर्म प्रसारक रेव्हरंड एम्. ए. शेरिंग, अमेरिकन विदूषी डायना एल्.येक (ह्या नुकत्याच भारतात येऊन गेल्या), के. चंद्रमौली इत्यादी अनेक अभ्यासकांनी बनारसवर संशोधन करून अभिजात पुस्तके लिहिली आहेत. या पुस्तकांमधून त्यांनी खऱ्या बनारसचे वा काशीचे अध्यात्मिक व धार्मीक महत्त्व टिपण्याचा व तो सर्वांपुढे मांडण्याचा भगिरथ प्रयत्न केला आहे. त्यामुळे आपण सर्वांनी यांचे शतशः ऋण मानले पाहिजेत. सरतेशेवटी, हिंदूंच्या ह्या सर्वात पवित्र व महादेवाचा कायम वास असणाऱ्या शहराचा धार्मीक, सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा असाच कायम चालत राहो व महादेवाची कृपा सतत ह्या ठिकाणावर व संपूर्ण भारतवर्षावर राहो अशी प्रार्थना करून 'ओम नमो शिवायः' असे म्हणावेसे वाटते.

**संदर्भ :-**

बनारस द सिटी ऑफ लाईट - डायना एल. येक

इंडिया - अ सेक्रेड जिऑग्राफी - डायना एल. येक

काशी - द सिटी ल्यूमिनस - के. चंद्रमौली

बनारस - द सेक्रेड सिटी ऑफ द हिंदूज् - एम्.ए.शेरींग

अँन एनसायक्लोपेडिक सर्व्हे ऑफ - बेंजामिन वॉकर

हिंदूइझम् - हिंदू वर्ल्ड, खंड - १

**सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६

Email :subhashinscotland@gmail.com

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे याबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# दान : एक सामाजिक बांधिलकी- जीवन व मृत्यूचे बंधन नसलेली

*रक्तदान, नेत्रदान, त्वचादान, देहदान, अवयवदान यांचे महत्त्व या लेखात विशद केले आहे - संपादक*

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये दानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तहानलेल्याला पाणी, भुकेलेल्याला अन्न, वस्त्रहिनाला वस्त्र, निराधाराला आधार, अशिक्षिताला शिक्षण तर गरजवंताला पैसा असा पूर्वापार चालत आलेला मार्ग आपण देखील चोखाळतो. फार काय, तर आपल्यापैकी बरेचजण एखादी सामाजिक संस्था शोधून त्या संस्थेला देणगी देतात व सामाजिक बांधिलकी जपल्याचे समाधान मानतात. हे झाले दानाचे पारंपरीक प्रकार आपल्या पूर्वजांना उमजलेले, जे आज देखील तितकेच कालसुसंगत आहेत, तरी देखील गरजूंची एखादी गरज भागविण्यापुरते मर्यादित आहेत.

आजच्या काळात वैद्यकीय शास्त्रात झालेले संशोधन व विज्ञान- तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आरोग्य सेवेमध्ये अमुलाग्र बदल झाला व दानाचे क्षितिज विस्तारले. या दानांच्या अपारंपारिक प्रकारांमुळे आपल्यासारख्या सामान्य माणसाने एखाद्याचे प्राण वाचविणे, एखाद्याला नवजीवन देणे शक्य झाले. ह्या दानाच्या प्रकारात ना जाती, लिंग, धर्माचे बंधन आहे ना आर्थिक परिस्थितीची बूज. गरज आहे फक्त आपल्या इच्छेची.कारण आपली इच्छा असल्यास, आपण जिवंतपणी नियमीतपणे रक्तदान करून गरजूंचे प्राण वाचवू शकतो. तसेच मरणोत्तर नेत्रदान करून नेत्रहिनांना दृष्टी देऊ शकतो व त्वचादानाव्दारे भाजलेल्यांचे प्राण वाचवू शकतो. मरणोत्तर देहदान केल्यास आपला देह शरीररचनाशास्त्राच्या संशोधनाकरिता वापरला जाऊन आपण वैद्यकीय शास्त्रात मोलाची भर घालायला सहाय्य करू शकतो. समजा आपला मेंदू मृत झाला तर अवयवदान करून आपण एकाचवेळी बऱ्-याचजणांचे प्राण वाचवू शकतो.अशाप्रकारे आपण आपल्या जगण्याला उद्देश तर मृत्यूला अर्थ प्राप्त करून देऊ शकतो.

| दानाचा प्रकार | दानाची वेळ | पात्रता |
|---|---|---|
| रक्तदान | जिवंतपणी दर ३ महिन्यांनी | वयाच्या १८ ते ६५ वर्षांपर्यंत, ४५कि.ग्रॅ. पेक्षा जास्त वजन असलेली व १२.५ग्रॅ हिमोग्लोबीन असलेली कोणतीही निरोगी व्यक्ती |
| नेत्रदान | मरणोत्तर ४ ते ६ तासात | कोणतेही वय, लिंग, धर्म व रक्तगट असलेली व्यक्ती |
| त्वचादान | मरणोत्तर ६ तासात | १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती |
| देहदान | मरणोत्तर ६ ते ८ तासात | १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती |
| अवयवदान | फक्त मेंदू मृतस्थितीत | १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती |

**थोडक्यात पण महत्त्वाचे-**

- उपरोक्त दानाचे सर्व प्रकार ऐच्छिक आहेत. १८ वर्षांवरील कोणतीही व्यक्ती संकल्प-पत्र भरू शकते.
- मानवी रक्ताला अन्य कुठलाही पर्याय नाही व दान केलेले रक्त फार काळ साठवून ठेवता येत नसल्याने प्रत्येक निरोगी व्यक्तीने नियमीतपणे रक्तदान करण्याची गरज आहे.
- कोणाचा मृत्यू कधी, कुठे व कसा येणार हे माहीत नसल्याने प्रत्येकाने उपरोक्त दानाबद्दल माहिती मिळताच व त्याचे महत्त्व पटताच लागलीच सदर दानाचे संकल्प-पत्र भरून 'डोनर कार्ड' जवळ बाळगावे. तसेच आपल्या घरच्या लोकांना आपल्या इच्छेची कल्पना द्यावी.
- उपरोक्त कोणत्याही दानाचे संकल्प-पत्र भरलेले असले तरी देखील प्रत्यक्ष दानाच्यावेळी घरच्या लोकांची संमती आवश्यक आहे.
- मृत व्यक्तीच्या घरची माणसंदेखील आयत्यावेळी त्या व्यक्तीच्या मरणोत्तर अवयवदान किंवा देहदानाचा निर्णय घेऊ शकतात.
- मरणोत्तर नेत्रदान, त्वचादान व अवयवदानानंतर मृतदेह विद्रूप होत नाही. मृतदेह काळजीपूर्वक बँडेज करून देतात.तर देहदानाचा उपयोग डॉक्टरांना प्रशिक्षणाकरिता होतो.
- उपरोक्त दानांसाठी काही अपात्रतेचे निकषदेखील आहेत, जे संकल्प पत्र भरताना किंवा प्रत्यक्ष दानाच्यावेळी माहिती करून घेता येतात.

**अधिक माहितीसाठी व संकल्प पत्राकरिता संपर्क :**

- विनायक जोशी, अध्यक्ष, दधिची देहदान मंडळ, ठाणे- ९३२४३२४१५७
- सुरेश तांबे, कार्यवाह, दधिची देहदान मंडळ, डोंबिवली- ९८६७७५५५७२
- श्रीकांत आपटे, राजहंस प्रतिष्ठान, गोरेगाव- ९८२००७८२७३
- श्रीपाद आगाशे, ठाणे- ९९६९१६६६०७
- स्मिता अमोल लिमये, ठाणे- ९९८७००४०५८

**कृतार्थ जीवन, सार्थ मरण**

जीवंतपणी नियमीतपणे रक्तदान करून,
आपल्या व दुस-ऱ्यांच्या आयुष्याचे मोल वाढवा.

मरणोत्तर नेत्रदान व त्वचादान करून,
दुसऱ्-यांच्या आयुष्यात हास्य फुलवा.

मेंदू मृत स्थितीत अवयवदान करून,
दुसऱ्-याला जगण्याचे बळ द्या.

मृत्यूनंतर देहदान करून,
विज्ञानाचे क्षितिज वाढवा.

ह्या सर्व दानांची इच्छा मृत्यूआधी व्यक्त करून,
आपल्या मृत्यूला अर्थ प्राप्त करून द्या.

**-- स्मिता अमोल लिमये,**
**ठाणे.**
मो. ९९८७००४०५८

●●●

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# मातृभाषा हीच ज्ञानभाषा!

*२१ फेब्रुवारी या जागतिक मातृभाषा दिनानिमित्त सुप्रसिद्ध लेखक व पत्रकार अरविंद दोडे यांचे जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे आयोजित कार्यक्रमात ''मातृभाषा ज्ञानभाषा कशी होईल?'' या विषयावर अभ्यासपूर्व व्याख्यान झाले. हे व्याख्यान आम्ही 'दिशा' च्या वाचकांसाठी प्रसिद्ध करीत आहोत - संपादक*

व्यक्त वाणीला भाषण म्हणतात. 'भाष्' या धातूवरून भाषा शब्द बनला आहे. भाषा हे समाज व्यवहाराचं सर्वश्रेष्ठ साधन आहे. हे साधन प्रतीकात्मक आहे. वाणीला लिपीच्या द्वारे स्थिरता येते. तिचा विस्तारही होतो. त्यामुळे आपण प्राचीन ग्रंथ वाचू शकतो. ऐकू शकतो... जागतिक मातृभाषा दिनाच्या निमित्ताने...

**२१ फेब्रुवारी २०१६ : जागतिक मातृभाषा दिन...**

जगात जो कुणी आदिमानव जन्माला आला असेल, त्याला प्रारंभी बोलणं अवगत नव्हते. आपले विचार, भाव आणि कल्पना दुसऱ्यांना कळविण्याचं काही साधनच नव्हते. एकाकी जीवनात तशी गरजही भासली नसेल, पण कालांतरानं त्या आदिमानवांचा समूह बनला, तेव्हा त्यातल्या प्रत्येकाला आपले विचार आणि भाव व्यक्त करण्याची गरज निर्माण झाली असेल. आधी तो अंगविक्षेपानं अभिव्यक्त करीत असेल, पुढे तो मुद्राभिनय करू लागला. पशूपक्ष्यांची नक्कल करणं त्याला साध्य झालं. नंतर विशिष्ट वस्तूसाठी अन् व्यक्तीसाठी ध्वनीचा उपयोग करू लागला.

१. **भाषेची सृष्टी :** मानव सृष्टीबरोबरच भाषेचीही सृष्टी तयार होत गेली. अजूनही ती गतीनं तयार होताना दिसत आहे. जगात शेकडो भाषा बोलल्या जातात. हे भाषाभेद किती प्राचीन आहेत, हे सांगणं अशक्य आहे. आपण आपल्या वडिलधाऱ्यांकडून भाषा शिकतो. भाषा शिकण्याचं सामर्थ्य माणसात स्वभावतःच असतं.

भाषा हा एक संस्कार आहे. भाषा ही एक रुढी असते. भारतीय भाषा परिवार फार मोठा आहे. भारतीयांची मूळभाषा होती संस्कृत. बुद्धाच्या नंतर काही नव्या भाषा निर्माण झाल्या. त्यांच्यावर संस्कृताचा प्रभाव दिसून येतो. भाषिक परिवर्तन असे घडत गेले. मध्ययुगाच्या प्रारंभी पाली आणि 'अशोकी प्राकृत' या भाषा वाढत गेल्या.

महाराष्ट्री भाषा ही मुख्यत्वानं गीतिकाव्याची आहे. हालकृत 'गाथा सप्तशती' आणि कवी प्रवरसेन याचं, 'सेतुबंध' हे काव्य महाराष्ट्री भाषेत आहे. सध्या देशात असंख्य भाषा असल्या, तरी भाषाविज्ञानाचा विचार करताना मनोविज्ञानाची मदत घेतली जाते. समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, साहित्य, व्याकरण यांचाही विचार करतात. भाषा आणि पोटभाषा या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पोटभाषा म्हणजे बोलीभाषा.

महाराष्ट्रात वऱ्हाडी, देशावरची, पुणेरी, कोकणी अशा काही पोटभाषा असून बोलीभाषा पुष्कळ आहेत. खानदेशी, मालवणी, बेळगावी, मराठवाडी अशा नावांची त्यात भर पडते. थोडक्यात काय, तर आपल्या भाषेतून आपण ज्ञान मिळवू म्हटलं, तर शक्य आहे का?

भाषाविषयाकडून आपण मातृभाषेचा विचार केला तर मराठीला वैभव प्राप्त करून देण्यासाठी ती ज्ञानभाषा होणं आवश्यक आहे. जगातल्या लोकांच्या वेगवेगळ्या मातृभाषा आहेत. त्यातल्या अनेकांना मातृभाषेतून सर्व प्रकारचं शिक्षण घेता येतं. देशोदेशी हे चित्र दिसतं.

२. **ज्ञानभाषा मराठी** : ज्ञानभाषा म्हणजे ज्ञान देण्याघेण्याची भाषा. मराठी अस्तित्वात येण्यापूर्वी आणि नंतरही ती ज्ञानभाषा होती का? महाराष्ट्री भाषा ही मराठीचं आधीचं रूप. यादवकाळात म्हणजे तेराव्या शतकात मराठी ही लोकभाषा म्हणून स्थिरावली होती.

लोकभाषेला आपल्या उपदेशाचं माध्यम म्हणून वापरणारे एकनाथ, चक्रधर आदी संतकवींनी सर्वत्र संचार केला. नाथ, वारकरी, दत्त, रामदासी, शाक्त आदी पंथ किंवा संप्रदाय यांनी मराठी साहित्य लेखन केलं. त्या काळात ज्ञानभाषा संस्कृत होती. मराठीतील साहित्य हे सुद्धा केवळ अध्यात्मविद्येच्या क्षेत्रापुरतंच मर्यादित होतं.

आपल्या देशात चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा उल्लेख केला जातो. राजनीती, आयुर्वेद, गणित, ज्योतिष, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र अशा अनेक विषयांवर संस्कृतात विपुल साहित्य आहे. हे विषय मराठीत फार उशिरा आले. त्या काळात तंत्रज्ञान नव्हते का? घरबांधणी, सांडपाणी व्यवस्था वगैरे तंत्र विकसित झाली होती. जुनी बांधकामं पाहून आपण समजू शकतो. प्लम बॉबला=ओळंबा, स्पिरीटलेव्हलला=पाणसळ, टॉवेलला=थापी किंवा करणी असे काही शब्द अजूनही गावांकडे वापरले जातात.

ज्ञानभाषेचा इतिहास पाहिला की, अशा अनेक गोष्टी समोर येतात. जागतिक पातळीवरील ज्ञानभाषांकडे वळण्यापूर्वी आपल्याजवळची काही उदाहरणं पाहू या. पेशव्यांचे सरदार पानसे हे तोफखानाप्रमुख होते. ते उखळीच्या तोफांसाठी दारुगोळा तयार करीत असत. हे तंत्रज्ञान त्यांना ठाऊक होतं. शिवरायांनी अनेक तंत्रज्ञ आणि यंत्रज्ञ यांच्या सहकार्याने गडकिल्ले उभारले. बाजारपेठा वसविल्या. आरमार उभारले. हिराजी इंदूलकर हे बांधकाम विकासक होते. त्यांच्या उत्कृष्ट कामाची साक्ष म्हणजे किल्ले-रायगड!

अशा श्रेष्ठ लोकांचे ज्ञान ग्रंथबद्ध केलं गेलं नाही.

**३. इंग्रज राजवट** : इंग्रजी राज्य सुरू झाल्यावरच आपल्याला अभिप्रेत असलेलं विज्ञान आणि तंत्रज्ञान विकसित झालं. त्यांनी शाळा सुरू केल्या. भरपूर मानधन देऊन अनुवादाची कामं करवून घेतली. १८१८ ते १९४८ पर्यंतचा इतिहास पाहिल्यावर याचा प्रत्यय येतो. सुमारे सव्वाशे वर्षं ही शैक्षणिक आणि साहित्यिक प्रगती होत होती.

भाऊ दाजी लाड हे पहिले वैद्यक शिक्षणाचे विद्यार्थी. त्यांनी वैद्यकीय शिक्षण मराठीतून घेतलं होतं. दुर्दैवाने मेकॉलेसारख्या विचारसरणीच्या इंग्रजांनी प्राथमिक शिक्षण मराठीपुरतं मर्यादित केलं. पुढील शिक्षण इंग्रजीत केलं. मध्ययुगात युरोपात सर्व देशांत उच्च शिक्षण लॅटिन भाषेत दिलं जात असे. सामान्य जनतेला त्या ज्ञानाचा लाभ घेता येत नसे. कालांतरानं प्रत्येक क्षेत्रात त्या त्या देशी भाषेत शिकण्याची सोय झाली. मातृभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा मिळाल्यानं जनतेचा आर्थिक दर्जा सुधारला. ज्ञानाचे झरे गरिबांपर्यंत पोहचले, हे झालं परदेशांत.

आपल्या देशात मूठभर इंग्रजांनी करोडो लोकांवर इंग्लिश भाषा लादली. चवथी ते सातवी ह्या वर्गात मराठी वगळता, अन्य सर्व विषय त्यांनी इंग्लिशमधून शिकवले. आपल्या विद्वान सरकारनं त्यात काय बदल केला? भाषा प्रांतरचना झाली, तरी भारताची एकच भाषा नाही तयार केली. इंग्रजांच्या काळात सुमारे १०० वर्ष इंग्लिश भाषाच शिक्षणाचं माध्यम होती, म्हणून मराठी ज्ञानभाषा झाली नाही.

आणखी दुर्दैव असं की, न्यायमूर्ती महादेव गोविन्द रानडे यांनी देशी भाषांचा समावेश विद्यापीठात करावा, उच्च शिक्षणासाठी अभ्यासविषयातील प्रत्येकाने एक प्रबंध मातृभाषेत लिहावा म्हणून अनेक प्रयत्न केले. पण

इंग्रजांनी त्यांचा प्रस्ताव वेळोवेळी फेटाळून लावला. वि. का. राजवाडे आणि 'ज्ञानकोश' कार श्री. व्यं. केतकर यांनी व्यक्तिगत पातळीवर कार्य केलं. आता मूळ विषयाकडे वळू या.

**४. ज्ञानभाषाविषयक कायदा :** १६ नोव्हेंबर १९४५ रोजी 'युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अॅन्ड कल्चरल ऑर्गनायझेशन' म्हणजेच 'युनेस्को'ची स्थापना करण्यात आली. १७ नोव्हेंबर १९९९ रोजी 'जागतिक मातृभाषा दिना'ला सर्व सदस्य देशांनी मान्यता दिली. त्यानंतर जगात सर्वत्र २१ फेब्रुवारी या दिवशी हा विशेष दिन साजरा करण्यात येऊ लागला.

या दिनाचा हेतू काय?

भाषिक आणि सांस्कृतिक विविधता, बहुभाषिकतेला प्रोत्साहन देणं हे उद्देश मुख्य आहेत. अनुवादाचे आदानप्रदान या योजनेतून उत्तमोत्तम ग्रंथ देशोदेशी वाचले जावेत या दृष्टीनं ही मोहिम राबविली जात आहे. याचं मुख्य कार्यालय आहे फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे आणि 'युनेस्को'च्या महासचिव आहेत इरीना बोकावा.

विश्वातल्या काही देशांनी स्वतःची ज्ञानभाषा तयार केली. कोरिया, चीन आणि जपान तसंच रशिया आदी देशांत ज्ञानभाषा विकसित करण्यासाठी काही कायदे केलेत. माहिती आणि तंत्रज्ञानासाठी ह्या देशांनी परकीय भाषांचा अभ्यास केला. सरकार आणि भाषातज्ज्ञ यांच्या अथक प्रयत्नांनी त्या त्या देशांनी मातृभाषा समृद्ध केली. त्यांनी मातृभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा सुमारे पंचवीस वर्षांत मिळवून दिला. हे कसं काय घडलं? याला कारण म्हणजे बहुतेक देशांची भाषा स्वतंत्र आणि फार मोठ्या प्रमाणात एकच आहे. कोरियाची कोरियन, जपानची जपानी वगैरे. भारतात हे घडायला अजून किती काळा जाईल भगवान नरेन्द्र जाणे!

युरोपात किंवा ब्रिटनमध्ये जे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित होतं, त्याची माहिती प्रसिद्ध होते.

**५. ज्ञानभाषेबाबत विश्वास :** मातृभाषा ही ज्ञानभाषा व्हावी म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर न राहाता, उच्च शिक्षणाचं माध्यम म्हणूनही तिचा वापर सक्तीनं व्हायला हवा. आधुनिक शास्त्रं ही प्रामुख्यानं पाश्चात्य देशांत उदयास आली. विकास पावली. इंग्लिश आणि तत्सम भाषांमध्ये ही परिभाषा त्या त्या शास्त्रांबरोबर सहजपणे निर्माण झाली. परिभाषा निर्मितीचं काम भारतात भाषा संचालनालय करतं.

वैद्यकशास्त्र, अभियांत्रिकी, मानविकी, विज्ञान इत्यादी शाखांमधील विषयांचे सुमारे २७ परिभाषा कोश प्रसिद्ध झालेले आहेत. १९८० च्या दशकात राज्य मराठी विकास संस्था स्थापन झाली. व्यवहारक्षेत्रात मराठीचा वापर वाढविण्यासाठी मराठी विकास आणि विज्ञान परिषदेसारख्या संस्था अनेक वर्षांपासून प्रचार-प्रसाराचं काम करताहेत. या उपक्रमात शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ सहभाग घेताहेत, तरिही मराठीच्या अस्तित्वाचा लढा अधिक तीव्र होताना दिसतआहे. जागतिकीकरणाच्या लाटेत मराठी आहे कुठं?

१९९४ मध्ये महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कायदा करण्यात आला. मराठीला ज्ञानभाषा करण्याची जबाबदारी विद्यापीठांची असूनही मराठीची उपेक्षा होतेच आहे. सुमारे पन्नास वर्षांत मराठी ही उच्च शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये ज्ञानभाषा झालेली नाही. मातृभाषा ही जर ज्ञानभाषा होत नसेल तर मातृभाषा मोठ्या वेगानं मागे पडते. ती केवळ बोलीभाषा म्हणून जिवंत राहू शकते. मातृभाषा ही राजाभाषा म्हणून मान्यता मिळून पुरेसे नाही. तिचा विकास होण्यासाठी लोकभाषा आणि ज्ञानभाषा या दोन्ही पातळ्यांवर तिचं महत्त्व प्रस्थापित होणं आवश्यक आहे. त्यासाठी सक्ती आणि संधी या दोन्ही मार्गांचा वापर

करायला हवा. जनतेला विश्वास वाटायला हवा. मातृभाषा सक्तीची करताना ती ज्ञानभाषा असेल तर कोणी विरोध करणार नाही.

**६. परभाषा आणि मातृभाषा** : भारतातल्या लहान मुलांचाही दोन, तीन किंवा अधिक भाषांशी संबंध येतो. दोन वेगवेगळ्या मातृभाषा असणाऱ्या आईवडिलांच्या मुलांची संख्या वाढत असताना ही भाषाप्रीतही वाढत जाणार यात शंका नाही. परदेश प्रवास, परदेशातील वास्तव्य यांचा माणसांच्या भाषाजाणिवांवर परिणाम होत असतो. मराठीबद्दल बोलायचं झालं तर मराठी माणूस कितपत जागरूक आहे, हा प्रश्नच पडतो. इंग्लिश विरुद्ध आवाज उठविण्यात धन्यता मानण्यापेक्षा मराठीला ज्ञानभाषा करण्याचे प्रयत्न भव्य-दिव्य प्रमाणात व्हायला हवेत. शहरातले इंग्रजीवाले भारतीय भाषांकडे तुच्छतेनं पाहातात. ते म्हणतात, 'आमची भाषा शिका, तिला आपलं म्हणा, पण तिला आपली मालमत्ता समजून वागाल, तर याद राखा!'

'तुमची बाजू कोणती?' असा प्रश्न कुणी विचारला, तर आपण काय उत्तर द्यायचं? हा प्रश्न ज्यानं त्यानं सोडवावा. ज्या भाषेत तुम्हाला स्वप्नं पडतात, तीच तुमची खरी भाषा! स्वप्न हीच एक भाषा असते.

अरुण कोलटकर यांनी आपला 'जेजुरी' हा काव्यसंग्रह इंग्रजीत लिहिला. तो प्रकाशित झाल्यावर भालचंद्र नेमाडे वगैरे प्रसिद्ध साहित्यिकांनी कोल्हटकरांना धारेवर धरलं, जणू काही कोलटकरांनी महापाप केलं होतं. परदेशात खपण्यासाठी एक स्वस्त युक्ती म्हणून 'जेजुरी'ची वासलात लावण्यात आली. असो.

उर्दूबाबत एक गोष्ट सांगण्यासारखी आहे.

नवी उर्दू बेधडकपणे परक्या भाषांमधले शब्द आत्मसात करत असते. अशी भाषा तग धरू शकते. भाषेच्या बाबतीत सोवळेपणा मानला, तर भाषा आजारी पडते. दुर्दैव असं की, भाषा शुद्ध राखण्यासाठी लोक आपल्याकडे केवढा आटापिटा करतात, हे सतत पाहायला मिळतं.

**७. बदलती बाजारपेठ** : बदलत्या बाजारपेठेची चिन्हं आता स्पष्टपणे दिसू लागली आहेत. मातृभाषा आणि ज्ञानभाषा यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न देशोदशी मोठ्या प्रमाणात होत असून, लेखक आपल्या पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठी वेगवगळ्या देशांमध्ये जाऊ लागले आहेत. प्रकाशन व्यवसायातला हा एक सोपस्कार आता महत्त्वाचा ठरला आहे.

वेल्श भाषाशास्त्रज्ञ प्रा. डेव्हिड डॅल्बी यांनी म्हटलंय, '२०२० पर्यंत भारत हा जगात सर्वाधिक इंग्रजी जाणणाऱ्या लोकांचा देश असेल. मुंबई हे इंग्रजी भाषिक संस्कृतीचं एक प्रमुख केन्द्र होईल. इंग्लिश पुस्तकांची मोठी बाजारपेठ म्हणून भारताकडे पाहिलं जाईल. विदेशातील इंग्लिश लेखक इथं 'प्रमोशनल टूर' वर येतील. काही वर्षांनी भारतीय पुस्तके अनुवादित होऊन परदेशांमध्ये खपू लागतील. तेव्हा काही मराठी लेखक अशीच 'टूर' काढतील, परदेशांत जातील.

मातृभाषा ही ज्ञानभाषा झाल्यावर आपल्या तंत्रज्ञानाला भाषिक स्थिरता येईल. 'हे विश्वचि माझे घर' ही उदात्त कल्पना प्रत्यक्ष अनुभवता येईल. ही वैचारिक विशालता भौगोलिक मर्यादा खोडून काढील. अर्थात हे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासाठी आर्थिक सुबत्ता हवी. सामाजिक शांतता हवी. साक्षरता, सुसंस्कृतता, रुंद कक्षेची जाण, साहित्यानुगामी खरेदीची मानसिकता अशा अनेक गोष्टी उच्च दर्जाच्या अपेक्षित असतात. या अपेक्षा युरोपात पूर्ण होत असल्यानं वाङ्मयाची परिमाणं ज्ञानभाषेच्या कसोटीवर कसास उतरतात. म्हणून तिथं भाषिक चळवळी अधिक जोमानं होतात. सत्तेवर बिनडोक लोक नसल्यानं सरकारी मदत मिळण्यास उशीर लागत नाही. विदेशांत

भाषिक वैर असलं तरी भाषिक देवाणघेवाण मित्रत्वानं होते.

**८. भाषेची भौतिक परिमाणे** : एका देशात एखादा चांगला लेखक असेल तर त्याची युरोपमध्ये दखल घेतली जाते. त्याची पुस्तकं भाषांतरित होण्यास ज्ञानभाषेमुळे फारसा त्रास होत नाही. संस्कार संकर जोरात होतो. भरपूर प्रती खपतात.

भारतात असंख्य भाषा आहेत, पण एकाही भाषेला ठळक परिचय मूल्य नाही. भारताला भाषिक ब्रँड नेम नाही. विदेश लोक आपल्या भाषांना 'इंडियन' म्हणतात. भाग्य! 'रेड इंडियन' म्हणून हिणवत नाहीत.

रशियन आणि चिनी भाषेला प्रचंड भौगोलिक आणि परिचयमूल्य आहे. भारताचं क्षेत्रफळ मोठं आहे. राजकीय, लष्करी, व्यापारी क्षेत्रात या मोठेपणाचा फायदा होतो, पण देशभाषा एकच नसल्यानं या विशालतेचा फायदा होत नाही. प्रांतवार तुकडे पडल्यानं भारतीय साहित्य वा ज्ञानभाषा अजूनही अशक्तच आहे.

आपल्या आसपासच्या लोकांच्या मातृभाषा आपल्याला येत नाहीत, त्यांची ज्ञानभाषा आपल्याला कळत नाही, म्हणून आपलं भाषिक जग हे अनेक अर्थांनी मर्यादितच राहिलंय. देशी भाषांची अवस्था पारशी जमाती सारखी झालीय. कमी कमी होत चाललीय. प्रादेशिकता आणि विश्वात्मकता यांचं रसायन अजून तयार व्हायचंय, आपली ज्ञानभाषा इतर भारतीय भागात जात नाही. परदेशात काय जाणार? अनुवादाशिवाय पर्याय नाही. भारतीय इंग्लिश लेखकांस बरे दिवस आलेत, पण भारतीय भाषेतील साहित्याला ते सुख कधी लाभेल का?

मातृभाषेला वाङ्मयीन मूल्य कमी असून राजकीय अन् सांस्कृतिक किंमत अधिक आहे. जसा भाषिक प्रवाह तशी ज्ञानभाषा विकास पावते, हा इतिहास आहे.

**९. विद्यापीठ स्थापनेबाबत** : महारष्ट्र शासनानं विदेशी ज्ञानभाषा विकास पद्धतींचा अभ्यास करून नवीन विद्यापीठ स्थापनेच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी शैक्षणिक विभागाची रचना केली आहे, ती 'संकुल पद्धतीची' असेल असं नमूद केलंय. तिच्यात महत्त्वाच्या गोष्टी अशा असाव्यात.

१. भाषाभ्यास, २. कला आणि संस्कृती अभ्यास ३. अनुवाद अभ्यास ४. उपयोजित भाषाभ्यास ५. ज्ञानभाषा निर्मिती ६. भाषा प्रमाणिकरण ७. विस्तार सेवा ८. संशोधन आणि प्रशिक्षण ९. माहिती-तंत्रज्ञान १०. दूरशिक्षण आणि ११. तौलनिक भाषाभ्यास.

वेळोवेळी विद्यापीठाला आवश्यक वाटतील अशी संकुलं उभारली जातील. ही सर्व संकुलं विद्यापीठाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक अन् अन्य बाबींच्या पूर्ततेसाठी कार्य करतील. मोडी लिपीचा अभ्यासही यात अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राज्याचं पुढील २५ वर्षांसाठीचं मराठी ज्ञानभाषाविषयक धोरण २०१४ चं हे असं आहे.

सारांश काय तर वि. वा. शिरवाडकर म्हणतात, त्याप्रमाणे सत्य आहे की, 'भाषेचा उत्कर्ष म्हणजे समाजाचा उत्कर्ष अन् भाषेचा ऱ्हास म्हणजे समाजाचा ऱ्हास.'

पुढील काळात मराठीच्या अभ्यासकांची प्रचंड गरज निर्माण होणार आहे, तेव्हा आतापासूनच मराठीच्या वाटेवर अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यावं. मातृभाषेला ज्ञानभाषा करावं, हीच अपेक्षा!

**- अरविन्द दोडे**
ठाणे-१
भ्रमणध्वनी : ९८१९१९५५९२
arvinddode@gmail.com

●●●

# शिक्षक आणि विद्यार्थी बदलत चाललेलं नातं

*गुरू ज्ञान देतो त्याचा आदर करायला शिका. तरच तुम्हाला ज्ञानप्राप्ती योग्य प्रकारे होईल याचे महत्त्व सांगणारा लेख - संपादक*

**छड़ी लागे छम्छम् विद्या येई घम्घम् छम्छम्...**

'श्यामची आई' या चित्रपटातील हे गाणं शिक्षकांचा मुलांवरील धाक/वचक (ज्यात त्यांचं विद्यार्थ्यांसाठी असलेलं हीत, प्रेम दडलेलं असतं) चित्रित केलेलं आहे. पूर्वीच्या काळी गुरुकुल शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. मुलांची मुंज झाल्यानंतर त्यांना गुरुकुलात पाठविण्यात येत असे. त्यांना घडविण्याची पूर्ण जबाबदारी गुरूवर सोपविण्यात येत असे. तिथे त्यांची दिनचर्या ठरलेली असायची. त्यांना स्वतःची कामे स्वतः करावी लागत. त्यामुळे मुलांवर श्रमसंस्कार होत. त्याशिवाय आश्रमातील इतरही कामे करावी लागत. गुरू शिष्यांवर ज्ञानाबरोबरच शिस्तिचा संस्कारही करत. त्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात प्रावीण्य मिळवून देत. गुरुकुलातून शिक्षण घेऊन बाहेर पडणारे शिष्य ज्ञानाच्या आणि संस्कारांच्या जोरावर समाजात आपले वेगळे स्थान निर्माण करत.

हे झालं गुरुकुल पद्धतीचं. अगदी दोन-तीन पिढ्यांपूर्वीही शाळेतील शिक्षकांच्या प्रेमळ धाकामुळे, शिस्तीमुळे मुलांना दिडकी, पावकीपर्यंतचे पाढे तोंडपाठ होते. ज्यामुळे त्यांना व्यवहारातील मोठे, मोठे, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी करताना कधीही तंत्रज्ञानाची गरज पडली नाही. त्यांचं मराठी तसंच इंग्रजी व्याकरणही इतकं पक्कं होतं की त्यांना त्यासाठी वेगळे क्लासेस लावण्याची गरज भासली नाही. कविता तोंडपाठ असत. त्याशिवाय त्यांचा अर्थही त्यांना माहीत असे. शिक्षकांचा स्वभाव म्हणजे शिस्त, कठोरता, ममता यांचा संगम. पालकांचा शिक्षकांवर पूर्ण विश्वास असायचा. शिक्षकांनी जर आपल्या मुलाला शिक्षा केली तर ती त्याच्या हितासाठीच हे पालक जाणून होते. कधीही पालकांनी शिक्षकांवर अविश्वास दाखविला नाही. त्यामुळे जेव्हा मुले अशा शिक्षकांच्या हाताखालून शिक्षित होऊन बाहेर पडत तेव्हा ते सुजाण सुशिक्षित, शिस्तप्रिय, प्रगल्भ नागरिक बनूनच! म्हणूनच त्याकाळी गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होती.

परंतु आज परिस्थिती वेगळी आहे. समाजातील काही शिक्षकांमुळे, त्यांच्या कठोर शिक्षांमुळे, वर्तनामुळे पालकांचं शिक्षकांबद्दलचं मन बदलत चाललं आहे. आज काल काही पालक आपल्या मुलांवर एवढा विश्वास ठेवतात की खऱ्या खोट्याची शाहनिशा न करता शिक्षकांवर आरोप करतात आणि नंतर कळतं की आपल्या मुलाने शिक्षकांवर केलेला आरोप खोटा होता. नंतर मग ते पालक माफी मागतात. परंतु त्यांना हे कळत नाही ह्यामुळे शिक्षक कोणत्या मानसिक परिस्थितीतून जातो. जे शिक्षक मुलांची शाळेत आई होऊन त्यांना शिस्त लावतात, योग्य-अयोग्य ह्याची समज देतात, ज्ञान देतात त्यांच्यावरच तुम्ही अविश्वास दाखवितात हे योग्य आहे का? काही-काही पालक तर आपल्या 'समाजातील पत'चा गैरवापर करायलाही मागे पुढे पाहात नाही. अशा पालकांना सांगावंसं वाटतं की तुम्ही तुमच्या मुलांच्या भविष्याशी खेळत आहात. अशी मुलं शिक्षित होतील परंतु सुशिक्षित होणार नाहीत. त्यांना त्यांचं अयोग्य वागणंही योग्य वाटणार. कारण त्यांना माहित आहे की आपण कसेही वागलो तरीही वाचवायला आपले आईवडील आहेत. ते संस्कार, शिस्त, सद्सद्विवेक बुद्धी याबाबतीत कफल्लक असतील.

आजचा विद्यार्थी शिक्षकांना घाबरेनासा, आदर करीनासा झाला आहे. आज शिक्षकांवर इतकी बंधनं आली आहेत की आज मुलांशी कसं वागायचं हाच त्यांना प्रश्न पडला आहे. आपल्या कोणत्या वागणुकीमुळे कोणतं मूल कसं दुखावलं जाईल आणि त्याचे परिणाम काय होतील हे माहीत नसल्यामुळे त्यांच्या वर्तनात फरक पडला आहे आणि त्याचा फायदा आजकालचे विद्यार्थी घेतात. जी आदरयुक्त भीती, धाक विद्यार्थ्यांना शिक्षकांबद्दल वाटायला हवा त्याचा आता ऱ्हास होत चालला आहे. त्यामुळे शाळा, कॉलेजमध्ये गैरप्रकार वाढत चालले आहेत.

शिक्षक हा मुलाला घडविण्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. पालकांच्या शिक्षकांविषयीच्या गैर विधानांमुळे, मुलांच्या मनात शिक्षकांविषयी नकारात्मक विचार रुजले जातात. शिक्षक सतत मुलांच्या हितासाठी, प्रगतीसाठी झटत असतात. परंतु पालकांच्या गैरविधानांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांचा धाक राहात नाही. पुढे हीच मुले शिक्षकांची खिल्ली उडवायला कमी करत नाहीत.

सर्वात शेवटी हेच संगावंसं वाटतं की जो गुरू ज्ञान देतो त्याचा आदर करायला शिका. तरच तुम्हाला ज्ञानप्राप्ती योग्य प्रकारे होईल. हे मुलांच्या मनावर कोरण्याची जबाबदारी पालकांची आहे.

**गुरुब्रह्मा, गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरुवे नमः।।**

**- सौ. रागिणी केळसकर**
सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडीयम स्कूल
पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे.

•••

(पृष्ठ क्र.११ वरून **नर्मदा परिक्रमा**)

भागविली आणि अशोकचा फोन आला की गोपाळ साहू यांच्या घरी भोजन प्रसादाची व्यवस्था झाली आहे.

गावाजवळ आलो असे वाटले. कारण भोजनाची व्यवस्था करण्यासाठी गोपालभैय्या आम्हाला भेटून पुढे गेले. तिथेच राहूल राजपूत यांनी थांबवून आग्रहाने चहा पाजला. गाव जवळच आहे म्हणून गप्पा मारत बसलो जवळपास अर्धा तास! निघालो सव्वा वाजला होता. गाव जवळ नव्हते. २ कि.मी. चालल्यावर खरे गाव आले. गोपाळभैय्या स्वतः वाट पाहात रस्त्यावर उभे होते.

उत्तम भोजन झाले. वरण, भात, गरम पोळ्या, भाजी, मिरचीचे लोणचे इ. खाऊन तृप्त झालो. दक्षिण तटावर आम्हाला 'नर्मदा बचाव अभियान' चे दोन कार्यकर्ते मोटर सायकलवर भेटले होते. ते उत्तर तटावरील होते व भोजनाचे निमंत्रण तेव्हाच मिळाले होते. काल फक्त फोन करून वेळ दिवस नक्की झाला इतकेच.

मैय्याकिनाऱ्यावरून पुढे निघालो, गोपाळभैय्याही बरोबर होते. नदीपुलापाशी आम्ही वर चढलो व राममंदिरात चहा पिऊन डांबरी सडकेने पुढे निघालो.

एका शेतात आग्रहाने बोलावून चहापान झाले. पुढे अलिगंज जवळ नर्मदा अभियानचे पूर्वी भेटलेले ते दुसरे कार्यकर्ते भेटले व गप्पागोष्टी चहापाना नंतर नदीकिनारी असलेल्या धर्मशाळेत मुक्काम केला.

इथे नदीकिनारा खूप रुंद, लांब व पूर्वीच्या दादर चौपाटीची आठवण करून देणारा आहे. पूर्ण पात्र उथळ असून चिखल नाही. पाणी गुडघाभर असावे!

पोहोचल्यानंतर सॅक अंगणात टाकून नदीकिनारा गाठला. तासभर तिथेच होतो.

**- अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# माँटेसरी शिक्षणाचे शिक्षण प्रक्रियेतील अनन्य साधारण महत्त्व

*माँटेसरी शिक्षण मुलांसाठी किती महत्त्वाचे आहे हे या लेखात विशद केले आहे - संपादक*

डॉ. मारिया माँटेसरी यांच्या अथक निरिक्षणातून आणि परिश्रमातून शिक्षण पद्धती विकसित झाली. गेलेल्या अनेक दशकांपासून विकसित व विकसनशील देशांमध्ये या शिक्षण पद्धतीचे यशस्वी प्रयोग झालेले आहेत.

आपणा सर्वांना हे माहीत असेलच की गुगलचे सह संस्थापक लॅरी पेज, विकिपिडियाचे संस्थापक जिमिवेल्थ जगप्रसिद्ध विचारवंत हेलन केलर, शास्त्रज्ञ विक्रम साराभाई या सर्वांच्या यशाचे रहस्य कशात आहे? असा प्रश्न जेव्हा त्यांना विचारला गेला, तेव्हा त्यांनी अभिमानाने नमूद केले की त्यांच्या शिक्षणाचा पाया माँटेसरी शिक्षण पद्धतीत झाला आहे.

प्रत्येक मुलामध्ये जन्मतःच विविध कौशल्ये सुप्त अवस्थेत असतात. वय वर्षे ३ पर्यंत ही कौशल्ये सुप्त अवस्थेत तर ३ ते ६ वर्षांच्या काळात ती वेगाने विकसित होतात. या वयात बालक त्यांच्या विकासाच्या मार्गात येणाऱ्या सर्व अडथळ्यांवरती मात करण्याचा प्रयत्न करतो. प्रत्येक बालकामध्ये एक ईश्वरीय देणगी असते ज्याला डॉ. माँटेसरी यांनी 'Life force' असे म्हटले आहे. बालकामधील उपजत कौशल्यांना विकसित करण्यासाठी माँटेसरी शिक्षण पद्धतीमध्ये उत्कृष्ट अशा शैक्षणिक वातावरणाची निर्मिती जाणीवपूर्वक केलेली असते. ज्याच्यामुळे त्याची शारीरिक, मानसिक, भावनिक व बौद्धिक वाढ होते. ही वाढ त्याला त्यांच्या उच्च शिक्षणाच्या विविध पायऱ्या ओलांडताना उपयुक्त ठरते.

माँटेसरी शिक्षण पद्धतीमध्ये वयाच्या ३-६ वयोगटातच बालकांना प्रत्यक्ष (concrete) शैक्षणिक अनुभव देण्यात येतो. उदा. गणितातील त्रिकोण, चौरस, वर्तुळ, आयत यांच्या प्रतिकृती हातळण्यासाठी दिल्या जातात. अशाच प्रकारे भाषा, विज्ञान, कला, संगीत यांचा विकास केला जातो. त्याचबरोबर बालकाची पाचही ज्ञानेंद्रिये अधिकाधिक कार्यक्षम होतील याची काळजी घेतली जाते. तसेच जीवनामध्ये स्वावलंबी होण्यासाठी बालकांना प्रत्यक्ष जीवनातील कौशल्ये (practical life skill) शिकवली जातात. उदा. कपड्याच्या घड्या घालणे, कात्री काम, बागकाम, सोलणे, चिरणे, लेस लावणे, कचरा, लादी पुसणे, विविध आकाराच्या मण्यांच्या माळा ओवणे अशा विविध कृतींचा प्रत्यक्ष अनुभव दिला जातो की ज्यामुळे बालक स्वावलंबी बनते. यातून अप्रत्यक्षपणे त्यांचे छोटे मोठे स्नायू (Motor Skill) विकसित होतात, eye-hand इ. कौशल्ये विकसित होतात. बालकामध्ये अतिशय चांगली एकाग्रताही निर्माण होते.

वस्तू नियोजित ठिकाणी ठेवणे, वर्ग स्वच्छ ठेवणे, वेळेत काम पूर्ण करणे इ. गोष्टी बालक शिकतो. ह्या सर्वांमुळे बालकाचा सर्वांगिण विकास होतो. जो त्याच्या भावी शिक्षणाचा व व्यक्तिमत्त्वाचा भक्कम पाया असतो.

"Montessari is an education for independence, preparing not just for school, but for life."
- Dr. Maria Montessori

**- सौ. मृणाल जामबोटकर**
सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडीयम स्कूल
पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे.

●●●

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

**एलिमेंटरी व ईटरमिजिएट चित्रकला श्रेणी परीक्षा २०१५-२०१६ :**

**एलिमेंटरी श्रेणी परीक्षा - १००%**

एकूण विद्यार्थी ६५

उत्तीर्ण विद्यार्थी ६५

'अ' श्रेणी ३२

'ब' श्रेणी २३

'क' श्रेणी ०९

**इंटरमिजिएट श्रेणी परीक्षा- ९५.३४%**

एकूण विद्यार्थी ४३

उत्तीर्ण विद्यार्थी ४१

अ' श्रेणी ११

'ब' श्रेणी १५

'क' श्रेणी १५

**रामायण परीक्षा २०१५ - २०१६ :**

परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी - २६

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी - १९

| विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | १० | ५ | ३ |

विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांची नावे -

विद्यार्थ्याचे नाव गुण

१) श्रीया दानेकर ८०/१००

**इतिहास प्रज्ञा शोध परीक्षा २०१५ - १६ :**

| इयत्ता | परीक्षेस बसलेले विद्यार्थी | उत्तीर्ण झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | १७ | १५ |
| ८ वी | ३३ | २१ |
| १० वी | ७२ | ७१ |

सर्वात जास्त गुण मिळणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | विद्यार्थ्याचे नाव | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| ५ वी | मृण्मयी गांगल | ८४ | |
| ८ वी | प्रथमेश वालावलकर | ७२ | |
| १०वी | शांभवी जोशी | ९४ | जिल्हास्तरीय १ला क्रमांक |

**होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा २०१५ -२०१६ निकाल :**

इ. ६ वी - मिहीर गोरे - रौप्य पदक

इ. ९ वी - आयुष म्हात्रे - कास्य पदक

**२०१५-२०१६ च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

राज्य पुरस्कार मिळालेल्या बालवीरांची नावे खालीलप्रमाणे :

१) अभिषेक कोमुरलेकर २) प्रथमेश वालावलकर

३) आर्य निसार ४) सिद्धेश वाळंज

५) सोहम शिंपी ६) अथर्व जांबोटकर

७) रुग्वेद लांघी

ठाणे टपालखाते आयोजित पत्रलेखन स्पर्धेचा निकाल :

रुचिरा जोशी - प्रथम क्रमांक

इशिता सुळे - द्वितीय क्रमांक

चातुर्य उपासने - तृतीय क्रमांक

**क्रीडा :** कला क्रीडा महोत्सव आयोजित विविध क्रीडा स्पर्धेत आमच्या विद्यार्थ्यांना मिळालेले यश खालीलप्रमाणे :

**अ) ॲथलेटिक्स** - १४ वर्षाखालील आमच्या संघाने तिसरे पारितोषिक मिळवले.

संघ खेळाडू : गौरांग आचरेकर, यश कद्रेकर, हितुल छाडवा व केदार हर्डीकर.

**ब) जलतरण-** ओंकार राऊतने खालील पदके मिळवली:

१) २०० मी. व ४ x ५० फ्री स्टाईलमध्ये रौप्यपदक.

२) १०० मी. बॅकस्ट्रोक, १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक व १०० मी. फ्रिस्टाईलमध्ये ताम्रपदक .

**क) जिमनॅस्टिक -**

१) पॅरलल बार स्पर्धेत ऋग्वेद नलावडेने कास्यपदक मिळवले.

२) बॅलन्सिंग बीम स्पर्धेत ऋचा देवळेने कास्यपदक मिळवले.

**हिंदी राष्ट्रभाषा परीक्षा २०१५ - २०१६ :**

| इ. | परीक्षेचे नाव | उपस्थित विद्यार्थी | निकाल | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | विशेष प्राविण्य | प्रथम श्रेणी | द्वितीय श्रेणी | तृतीय श्रेणी |
| ५ वी | बालबोधिनी | १६ | ०१ | ११ | ०३ | ०१ |
| ६ वी | प्राथमिक | १३ | ०५ | ०५ | ०२ | ०१ |
| ७ वी | प्रवेशिका | ०९ | - | ०६ | ०३ | - |
| ८ वी | सुबोध | ०३ | - | ०१ | ०२ | - |
| ९ वी | प्रबोध | ०३ | ०२ | - | ०१ | - |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही ''डॉ. वा. ना. बेडेकर राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धा २०१६ चे आयोजन करण्यात आले.

दुष्काळ शेतकरी आत्महत्या या देशभरातल्या, ज्वलंत चर्चेसोबतच अजून एक चर्चा होती. 'पुरस्कार वापसी' या विषयावर देखील राज्यातील अनेक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. एकुण बारा संघांपैकी पाच संघाना पारितोषिकांनी गौरविले.

प्रथम क्रमांक साताऱ्यातील डी. पी. भोसले महाविद्यालयातील मिथून माने आणि किरण किर्तीकर यांना रोख रक्कम ५०००, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले.

द्वितीय क्रमांक महाविद्यालयातील किन्नरी जाधव आणि प्रज्ञा पोवळे यांना रोख रक्कम २०००, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

तृतीय क्रमांक महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयातील एकनाथ गोपाळ, आनंदराज घाडगे यांना २००० रोख रक्कम, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आहे.

रत्नागिरी येथील फिनोलेक्स महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिक ऋषिकेश डहाळे, भाग्यश्री पाचरेकर तसेच विधी महाविद्यालयातील स्वानंद गांगल, सिद्धांत नाईक या विद्यार्थ्यांना देण्यात आले.

या स्पर्धेस विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, तसेच प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे मोलाचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांस लाभले.

ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दामोदर मोरे, लेखक कादंबरीकार प्रा. अरविंद दोडे आणि वाकू लेखनकार ग्रंथपाल प्रा. भरतकुमार शुक्ल हे प्रमुख परीक्षक म्हणून लाभले होते.

ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा. विमुक्ता राजे, प्रा. महेश पाटील, प्रा. विनोद चंदवाणी, प्रा. नितीन पागी इ. यांनी अथक प्रयत्न केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे व ग्रन्थपाल प्रा. नारायण बारसे यांनी योग्य सहकार्य केले.

**राष्ट्रीय परिषद**

फिल्म सोसायटी आणि पत्रकारिता विभागातर्फे जानेवारी २०१६ राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेचे उद्घाटन सुप्रसिद्ध दिग्दर्शक, अभिनेते, लेखक व निर्माते अनंत महादेवन यांच्या हस्ते झाले. परिषदेच्या निमित्ताने पुणे येथील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय यांच्या सहकार्याने १९१३ ते २०१५ या १०२ वर्षाच्या कालखंडातील भारतीय चित्रपटाचे पोस्टर्स प्रदर्शनात लावण्यात आले.

या परिषदेत 'भारतीय चित्रपट समीक्षकांच्या नजरेतून' या विषयावर ज्येष्ठ समीक्षकांचे चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चा सत्रात सुधीर नांदगावकर, रफीक बगदादी, श्रीमती रेखा देशपांडे इ. मान्यवरांचा सहभाग होता.

अमेरिकेतील सुप्रसिद्ध लेखक व प्राध्यापक दरायस् उपर यांनी सत्यजित रे व गुरुदत्त यांच्या चित्रपटावर उत्कृष्ट व्याख्यान केले. तसेच मुंबई विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभाग प्रमुख डॉ. कांचना महादेवन यांनी 'मूल्ये व भारतीय चित्रपट' या विषयावर व्याख्यान दिले. ज्येष्ठ लेखक व चित्रपट समीक्षक व परिक्षक अशोक राणे यांनी 'जागतिक सिनेमा व भारतीय सिनेमा' या विषयाधारित व्याख्यान दिले. सोसायटी ऑफ मोशन पिक्चर अॅण्ड टेलिव्हिजन इंजिनिअर्स ऑफ इंण्डिया या संस्थेचे अध्यक्ष उज्ज्वल निडगुलकर यांनी चित्रपट, तंत्रज्ञान 'काल-आज-उद्या' विषयावर PPT द्वारे उत्कृष्ट सादरीकारण केले.

परिषदेचे समापन सुप्रसिद्ध पार्श्व गायिका हिंदी व मराठी विजेती वैशाली मांडे यांच्या उपस्थितीत झाले. प्रा. विमुक्ता राजे यांनी वैशाली मांडे यांची मुलाखत घेतली व त्यांचा गायिका म्हणून उदयास आलेला प्रवास गीतांच्या साहाय्याने रंजक अनुभवातून उलगडून सांगितले. त्यांचे सध्या प्रसिद्ध झालेले गाणे पिंगा ग पोरी पिंगा... हे गाणं देखील त्यांनी गायले व प्रेक्षकांची मने जिंकली. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह तसेच परिषदेचे समन्वयक प्रा. महेश पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी परिषदेसाठी परिश्रम घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या दोन दिवसीय परिषदेत अमेरिका, कॅनडा, मलेशिया, दुबई इत्यादी देशांतील शोधनिबंध सादर

करण्यात आले, शिवाय भारतातील लखनौ, जयपूर, गोवा, वेंगुर्ला, ग्वाल्हेर, वर्धा, मुंबईतील विविध महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील शोधनिबंध सादर केले.

**मराठी विभाग**

महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे 'लेखक आपल्या भेटीला' या कार्यक्रमा अंतर्गत सुप्रसिद्ध लेखकांची मांदियाळीच प्रत्येक महिन्याला सुरू होती. यात सदानंद मोरे, शफाअत खान, अरविंद दोडे, रंगानाथ पठारे इत्यादी अनेकानेक लेखकांची उपस्थिती या कार्यक्रमात होती.

मराठी विभागातर्फे 'मराठी राजभाषा दिन' देखील साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान प्राचार्या शकुंतला सिंह यांनी भूषविले. तसेच अभिजात मराठी भाषा समितीचे अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रंगनाथ पठारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. रंगनाथ पठारे म्हणाले, ''भाषा म्हणजे केवळ शब्दांचा समुच्चय नाही.'' हजारो वर्षांचे ज्ञान वहन करण्याची क्षमता भाषेत असते. मराठी भाषा ही स्वतंत्र असून ती संस्कृतपासून निर्माण झालेली नाही. मराठी भाषेचे मारेकरी मराठी माणसेच असून जगाच्या पाठीवर भाषेचे रक्षणकर्ते दिसतात. पण मराठी भाषा टाकून देण्यात मराठी माणसेच उतावळी झालेली आहेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

यावेळी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल भाबड यांचीही भाषणे झाली. उपप्राचार्य सुभाष शिंदे व ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यास मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे शैलीदार सूत्रसंचालन पंकज चव्हाण या विद्यार्थ्याने केले.

**तत्त्वज्ञान विभाग**

महाविद्यालयाच्या तत्त्वज्ञान विभागातर्फे 'संत साहित्य' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा तत्त्वज्ञान संशोधन केन्द्र आणि मराठी संशोधन केन्द्र (मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन संत साहित्याचे गाडे अभ्यासक आणि ८८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

'भगवद्गीता व संत साहित्याचे नाते' या विषयावर डॉ. सदानंद मोरे यांनी व्याख्यान दिले.

मराठी संशोधन मंडळाचे संचालक डॉ. प्रदीप कर्णिक हे देखिल या प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी मराठी संशोधन मंडळाचे उद्दिष्ट्ये व ध्येय आपल्या भाषणातून प्रेक्षकांपुढे मांडली.

समाजातील अस्थिरता नष्ट करायची असेल तर समाजाच्या सर्व स्तरांत संत साहित्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे असे मत यावेळी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांनी व्यक्त केले.

संत साहित्याच्या कार्यशाळेचे सूत्र संचालन डॉ. सुचित्रा नाईक यांनी केले. यावेळी ग्रंथालय प्रमुख प्रा. नारायण बारसे, डॉ. अनिल ढवळे प्रा. अनिल भाबड, प्रा. संतोष राणे, प्रा. अविनाश वाघमारे, प्रा. मोहिनी नाडकर्णी, प्रा. वेदवती परांजपे, प्रा. आभा पांडे, प्रा. प्रियंवदा टोकेकर, प्रा. प्रज्ञा राणेबहादूर, प्रा. मुग्धा केसकर आदी उपस्थित होते.

**महिला विकास कक्ष**

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षातर्फे जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून कर्तृत्त्ववान महिलांना सलाम करण्यात आला. यावेळी वेदकालीन स्त्रिया विश्पला, इन्द्राणी, गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषी ते भारतीय संत परंपरेतील आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील महिलांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

राणी लक्ष्मीबाई सोबत उभी राहणारी ज्युलेखा, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, हिंदू लेडी रखमाबाई, अरुणा असफअली, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कर्तृत्त्व गाजवलेल्या अनेक स्त्रिया, मेधा पाटकर, मृणाल गोरे, रझिया पटेल, पहिले दलित स्त्री आत्मकथन लिहिणाऱ्या शांताबाई कांबळे, कॅन्सरशी झुंज देत मुक्तांगण चालविणाऱ्या डॉ. सुनंदा अवचट अशा विविध महिलांच्या कार्याची महती प्राध्यापिकांनी आपल्या सादरीकरणातून सांगितली. तसेच लेखिका ज्योती म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो' नाटकाचा एक भाग सर्व प्राध्यापिकांनी पथनाट्याच्या स्वरुपात सादर केला. देवदासींसाठी कार्य करणाऱ्या भीमराव गस्ती यांच्याही कार्याचा आढावा या कार्यक्रमात घेण्यात आला.

या कार्यक्रमात डॉ. सुजा रॉय अब्राहम, प्रा. प्रज्ञा राजे बहाद्दूर, प्रा. अर्चना डोईफोडे, प्रा. अर्चना प्रभुदेसाई, प्रा. गीतांजली चिपळूणकर, प्रा. स्वाती भालेराव, प्रा. वेदवती परांजपे, प्रा. पुजा मूळे, प्रा. रुचिता गावडे, प्रा. आभा पांडे, प्रा. विमुक्ता राजे, प्रा. क्रांती डोईबोले इत्यादी प्राध्यापकांनी सहभाग घेतला होता. तसेच या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांना आयकॉन फाऊंडेशनचा 'महाराष्ट्र कन्या' हा पुरस्कार प्राप्त झाला. यासाठी महाविद्यालयातर्फे आणि माजी विद्यार्थी 'सर्ज' संघटनेतर्फे प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने बोलताना प्राचार्यांनी स्त्रियांची बलस्थाने व कमकुवत स्थाने यांचा अभ्यास केला पाहिजे. आजच्या स्त्रीने अधिक सक्षम होण्याची गरज आहे परंतु तिची सक्षमता ही माणूसकी आणि विजयासोबतच आली पाहिजे असा मोलाचा सल्ला दिला.

कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन प्रा. प्रियंवदा टोकेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुचित्रा नाईक व प्रा. टोकेकर यांनी केले.

**संस्कृत विभाग**

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या सहकार्यामुळे संस्कृत विभागाला 'कारक' कार्यशाळेच्या पर्वणीचा अनुभव घेण्याची संधी मिळाली.

पुणे येथील भांडारकर संशोधन संस्थेत अमेरिका विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. जॉर्ज कार्डोना यांचे 'कारक' या विषयावर १ फेब्रुवारी ते ४ मार्च या कालावधीत सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पुणे येथून या कार्यशाळेचे थेट प्रक्षेपण संस्कृत विभागासाठी करण्यात आले होते. विद्यार्थी व संस्कृत विभागाच्या शिक्षकांनी या कार्यशाळेत आपली उपस्थिती दर्शविली. पाणिनीय व्याकरण व वाक्पदीय तसेच व्याकरणावरील काही टीका ग्रंथावर साधक-बाधक चर्चा डॉ. कार्डोना यांनी केली. विद्यार्थी व शिक्षकांना वाक्पदीय अतिशय सोप्या भाषेत त्यांनी समजाविले. संपूर्ण 'कारक' प्रकरणावर देखील मार्गदर्शन केले. संस्कृत विभागाला या कार्यशाळेचा मोठा लाभ झाला.

**प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांना 'महाराष्ट्र कन्या गौरव' पुरस्कार**




विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांना आयकॉन फाऊंडेशन तर्फे 'महाराष्ट्र कन्या गौरव'

पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कुलाबा येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्यात माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी हे अध्यक्ष म्हणून तर विशेष सरकारी वकील पद्मश्री उज्ज्वल निकम, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय देशमुख, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सोमवार दिनांक ७ मार्च रोजी हा पुरस्कार सोहळा पार पडला. पुरस्काराचे हे पाचवे वर्ष असून सुप्रसिद्ध चित्रपट अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, टेस्ट ट्यूब बेबीच्या जनक डॉ. इंदिरा हिंदुजा, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे आदी महिलांचा देखील यावेळी गौरव करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना फाऊंडेशनतर्फे दरवर्षी गौरविण्यात येते.

ठाणे जिल्हयातील आदर्श व सर्वोत्कृष्ट महाविद्यालय म्हणून नावलौकिक असलेल्या जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असलेल्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांना हा पुरस्कार शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या गेल्या ४० वर्षांच्या सेवेसाठी देण्यात आला आहे.

हा माझा एकटीचा सन्मान नसून संपूर्ण शिक्षण क्षेत्रातील सर्व महिलांचा व विद्यार्थी वर्गाचा व माझ्या महाविद्यालयाचा सन्मान आहे. या पुरस्कारामुळे नवीन ऊर्जा व स्फूर्ती मिळाली असल्याचे सांगत प्रा. डॉ. शकुंतला सिंह यांनी आयकॉन फाऊंडेशनचे ऋण व्यक्त केले. सदर पुरस्काराबद्दल या महाराष्ट्र कन्येवर चहुबाजूंनी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**इंग्रजी विभाग - शैक्षणिक**

पुढील वर्षी २०१६ मध्ये इंग्रजी विभागातर्फे जानेवारी महिन्यात महान नाटककार आणि काव्यकार शेक्सपिअरच्या ४०० व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येणार आहे. या अनुषंगाने महाविद्यालयात पूर्व परिषदेचे आयोजन करण्यात आले. या पूर्व परिषदेत इंग्रती विभागाच्या एकूण २५ विद्यार्थ्यांनी शेक्सपिअर लिखित 'द मिर्डसमर नाइटस् ड्रीम' या शृंगार व हास्यपूर्ण प्रसिद्ध नाटकाचे उत्कृष्ट रंगभूषा, वेशभूषेसहित सादरीकरण केले. या नाटकाच्या सादरीकरणात सर्वच विद्यार्थ्यांनी अथक प्रयत्न केले. तसेच इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका माधवी आरेकर, डॉ. सूजा रॉय अब्राहम, क्रान्ति डोईबोले यांनी खूप मेहनत घेतली. तसेच विभाग प्रमुख प्रमोद खराटे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्राचार्या शकुंतला सिंह यांनी विद्यार्थी व शिक्षकांना सर्व तऱ्हेची मदत करून प्रोत्साहन दिले.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१) महिला दिनानिमित्त स्पर्धा**

दिनांक २८ मार्च २०१६ रोजी महाविद्यालयाने ८ मार्चच्या महिला दिनानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये महिलांच्या विकासातील अडथळे या विषयावर वक्तृत्व स्पर्धा ठेवण्यात आली होती. प्रो. हेतल मिस्त्री व प्रो. स्मिता बनसोडे हे परिक्षक होते. यामध्ये कु. गुरुप्रीत कौर, निर्मल सिंग हिने प्रथम तर निता संख्ये यानी द्वितीय तर अनुपा सहानी हिने तिसरे बक्षीस मिळविले.

**२) पाणी विषयावर 'कविता लेखन' स्पर्धा**

दिनांक २२ मार्च २०१६ रोजी पाण्याचे महत्त्व या विषयावर कविता लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये प्रथम बक्षीस सिद्धेश कर्णिक यांना तर प्रा. लता सपकाळ यांना द्वितीय तर मैथिली खामकर यांना तृतीय बक्षीस मिळाले. ज्योती पाटील यांना उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले. परिक्षक म्हणून प्रा. राणे यांनी काम पाहिले.

**३) बाल सुधार गृह**

महाविद्यालयाच्या तृतीय विद्यार्थ्यांना भिवंडी येथील

बाल सुधार गृहाला भेट देण्यासाठी नेण्यात आले. यावेळेस अनेक विद्यार्थी हजर होते. यावेळेस प्रा. विनोद वाघ यांनी बाल सुधार गृहाविषयी माहिती दिली. तसेच न्यायाधीश बडे यांनी देखील विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना उत्तरे दिली.

**४) प्रात्यक्षिक परीक्षा**

प्रथम, द्वितीय व तृतीय विधीची प्राथमिक परीक्षा २ मार्च, १८ मार्च व २९ मार्च रोजी पार पाडली. यावेळेस तिन्ही वर्षाचे सर्व प्रात्यक्षिक परीक्षा संपवून निकाल जाहीर करण्यात आला.

**५) न्यायाधीश म्हणून निवड**

महाविद्यालयामध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या प्रा. लता सकपाळ व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी ॲड. राहुल गायकवाड यांची नुकतीच ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट फस्ट क्लास (JMFC) या पदावर निवड झाली आहे. त्यानिमित्ताने महाविद्यालयाने त्यांचे कौतुक व सत्कार करण्याचे ठरविले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'भारतीय संविधान व संसद' या विषयातील वक्तृत्व स्पर्धेमध्ये भाग घेतला.

६) के. सी. विधी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या अभिरूप न्यायालय स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचा केतन दापके व आकाश वारंग या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**Application of Mathe Magic in different field of Science and Technology या विषयीची एक दिवशीय परिषद संपन्न...**

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे तर्फे Application of Mathe Magic in different field of Science and Technology या विषयावर दि. १२ मार्च २०१६ रोजी सकाळी १०.०० ते ५.०० या वेळेत तंत्रनिकेतनच्या A.V. रुममध्ये एक दिवशीय परिषदेचे आयोजन केले होते.




सदर परिषदेसाठी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सौ. कल्पना फळ (सिनिअर लेक्चरर, बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स ठाणे, व्हिजिक फॅक्टरी NMIMS, व मुंबई विद्यापीठ) अमोद कारखानीस (सल्लागार, NCERT आणि इतर शैक्षणिक मंडळ) सौ. संध्या गुप्ते (लेक्चरर झेविअर कॉलेज), डॉ. सुधाकर आगरकर (डीन, BRIMS ठाणे), सौ. एस. एम. गुप्ते (सिलेक्शन ग्रेड लेक्चरर, वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे) व श्रीमती फातिमा रिजवी (सिलेक्शन ग्रेड लेक्चरर, वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे) इत्यादी हजर होते. सर्व प्रथम कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर श्रीमती फातिमा रिजवी मॅडमने प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि कार्यक्रमाची रुपरेखा स्पष्ट केली.

प्रथम डॉ. सौ. कल्पना फळ यांनी Magic of Finonacci numbers या विषयीची माहिती दिली.

अमोद कारखानीस यांनी खेळाच्या आणि प्रतिमांच्या सहाय्याने गणित कसे मजेदार शिकता येते हे सांगितले. गणिताबद्दलची मनामध्ये असलेली भीती विविध पद्धतीने कशी कमी करणे शिवाय गणिताचे शिक्षण अधिक कसे मजेदारपणे आजच्या घडीला शिकता येईल हे सांगितले.

गणित शिकण्याच्या विविध साधनांची माहितीही त्यांनी उपस्थितांना करून दिली.

सौ. संध्या गुप्ते यांनी Mathe Magic विषयी माहिती सांगितली. शालेय स्तरावर आणि आपल्या जीवनात गणिताचे महत्त्व त्यांनी विशद केले. त्यांनी गणिताबद्दलच्या चित्रफीती उपस्थितांना दाखविल्या.

BRIMS, ठाणेचे प्रो. डॉ. सुधाकर आगरकर यांनी Ethno Mathematics and puzzle विषयीची माहिती दिली.

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनच्या गणित विषयाच्या प्राध्यापिका सौ. सुजाता गुप्ते यांनी वैदिक गणिताबद्दल माहिती दिली.

Calculus in real life बद्दल वि. प्र. मंडळातील, तंत्रनिकेतनच्या प्राध्यापिका श्रीमती फातिमा रिजवी यांनी माहिती दिली.

सदर कार्यक्रमास तंत्रनिकेतनमधील शिक्षक वर्ग उपस्थित होता. सदर परिषदेस जवळ-जवळ ६० विद्यार्थी सहभागी झाले होते.

कार्यक्रमाच्या शेवटी पोस्टर स्पर्धेत विजेत्या ठरलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते पारितोषिके दिली.

विजेते ठरलेले विद्यार्थी खालीलप्रमाणे

**प्रथम पारितोषिक विजेते विद्यार्थी**

१) इस्रिसाम चोगले २) श्रद्धा गिते

३) रेश्मा लिहे ४) नेहा तामखाने

**द्वितीय पारितोषिक विजेते विद्यार्थी**

१) सृष्टी तापसाखरे २) माधुरी गोसावी

३) भाग्यश्री भोईर

सदर परिषद आयोजनामागचा उद्देश हा विद्यार्थ्यांच्या गणित ज्ञानाचा विकास हा होता.

शेवटी सौ. सुजाता गुप्ते यांच्या आभार प्रदर्शनाने परिषदेची सांगता झाली.

●●●

---

(पृष्ठ क्र.१२ वरून **ओळख वनस्पतींची - मेडशिंगी**)

वनस्पती व प्राणी अभ्यासक नेमके झाड, प्राणी किंवा पक्षी याबाबत आपल्याला असलेली माहिती देऊ शकतो. हिंदीमध्ये या झाडाला भेडशिंग असे म्हणतात. भेड म्हणजे बकरी.

मेडशिंगीच्या बिया, साल व पाने यात औषधी गुणधर्म आहेत. प्राचीन काळापासून मेडशिंगीची पाने मधुमेहावर औषध म्हणून वापरतात. यावर आता अधिक संशोधन चालू असून परिणाम समाधानकारक आहेत. सालीचा उपयोग विविध त्वचारोगावर करतात. मात्र तज्ज्ञांच्या सल्ल्याने याचा वापर करता येईल.

या झाडाची लागवड मुद्दाम कुणी करत नाही. मात्र एक शोभेचे व सुवासिक फुले देणारे झाड म्हणून याची लागवड करण्यास हरकत नाही. या झाडाची मिजास फारशी नसतेच. लागवड बियांपासून करता येते. एकदा रुजले की फक्त वर्षभर काळजी घेतली की पुरे. पुढे झाड स्वतःची काळजी घेत हळूहळू मोठे होते. हिरव्या गर्द रंगाचे गोल घुमट असणारे हे झाड बागेची शोभा वाढविणारे व सुगंधी फुले देणारे नक्कीच आहे.

**- प्रकाश दुधाळकर**
एफ-२२, नीता अपार्टमेंट,
मिठागर-नवघर लिंक रोड,
मुलंड (पू.), मुंबई - ८१.
दूरध्वनी : २१६३ ६०५२

●●●

---

मानवी संबंध धावणाऱ्या आगगाडीच्या वेळापत्रकाप्रमाणे नसतात...
ते असतात औदुंबराच्या आडव्यातिडव्या पायवाटासारखे.

discontent and unrest have become the order of the day. Liberty does not mean selfishness, licence, violence, injury to men and property, discruption and dislocation of work and service, corrupt practices and indiscripline, high-handed and unsocial behaviour. Society cannot be held to ransom causing untold misery and loss, affecting peace and prosperity, production and prices, movement of men and goods.

लोकशाहीचा 'गाभा' राजकीय पक्ष आणि 'निवडणूका' आहे. 'पक्षांतर्गत' लोकशाही आज जवळजवळ अस्तित्वात नाही. लोकप्रतिनिधींच्या निवडीकरता चारित्र्य, किंवा कमीतकमी शिक्षणाची कुठलीही आवश्यकता नाही. आपल्या घटनेतही तशी तरतूद नाही. न्यायालये मात्र घटनेच्या कलमांना सुसंगत अशीच न्यायप्रक्रिया राबवतात. न्यायालयीन सक्रियताही आज, ध्वनी प्रदूषण किंवा रस्त्यावरील फलकबाजी पुढे हतबल झालेली दिसते. हीच आजची खरी शोकांतिका आहे. ठोकशाही आणि धटिंगणशाहीचा तो विजय आहे.

घटनेची ताकद ही तिच्या पृष्ठसंख्येमध्ये नसून, ज्या समाजाकरता ती लिहिलेली असते त्या समाजाच्या सांस्कृतिक जडणघडणीचे प्रतिबिंब तिच्या पृष्ठांमध्ये आहे का यावर अवलंबून असते. घटना ही जशी 'व्यक्ती माहात्म्य' असू शकत नाही, तशी ती कवी कल्पनाही असू शकत नाही. न्यायालये घटनेच्या कलमांचीच अमंलबजावणी करतात. भारतीय घटना आणि न्यायसंस्थेचे अभ्यासक मार्क गॅलेंटर (Marc Galanter) यांचे यावरील विचार म्हणूनच अंतर्मुख करायला लावणारे आहेत.

Contemporary Indian Law is, for the most part, propably foreign in origin on inspiration and it is notorionsly incongruent with the attitudes and concerns of much of the population which lives under it. However, the present legal system is firmly established and the likelihood of its replacement by a revived 'indigenous' system is extremely small. The modern Indian legal system, then presents an instance of the apparent displacement of a major intellectual and institutional complex within a highly developed civilization by one largely of foreign inspiration. ( Law and Society in Modern India, 1989 P.15)

**डॉ. विजय बेडेकर**

•••

## *हार्दिक अभिनंदन !*

डॉ. श्रीधर विठ्ठल जोशी हे विद्या प्रसारक मंडळ, ठाणे या संस्थेचे सर्व साधारण सभेचे १९८४ पासून सभासद आहेत.

नुकताच त्यांना ठाणे महानगर पालिकेतर्फे २०१५चा प्रतिष्ठेचा व मानाचा असा ''ठाणे भूषण पुरस्कार'' देऊन गौरविण्यात आले आहे.

यापूर्वीही त्यांना आदिवासी विकासाच्या क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र शासनातर्फे २००६ साली ''आदिवासी लेखक'' हा राज्य पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले आहे.

डॉ. जोशी व त्यांच्या पत्नी डॉ. सौ. स्मिता श्रीधर जोशी हे उभयता अडचणीत असलेल्या गोरगरिबांच्या मदतीला नेहमीच धावून जातात. ठाण्याच्या सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक व आरोग्य विषयक क्षेत्रात डॉ. पती-पत्नींचे कार्य गौरवास्पद आहे. ठाण्याच्या जनजीवनाशी समरस झालेले डॉक्टर असा उभयतांचा लौकिक आहे.

विद्या प्रसारक मंडळातर्फे डॉक्टर श्रीधर जोशी व सौ. स्मिता जोशी यांचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.